म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय नाटक
दा. क्र. २२१५८

IRBK-0122457

# कुर्यात् सदा टिंगलम्

लेखक
शिवराज गोर्ले

IRBK-0122457

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

□ प्रकाशक
अनिलकुमार मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

□ © शिवराज गोर्ले

□ प्रथमावृत्ती
डिसेंबर १९८७

□ मुखपृष्ठ : बाबू उडुपी

□ मुद्रक
सौ. कमल रामचंद्र वळसारी
संजीव मुद्रणालय
४६९, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

□ मूल्य : वीस रुपये

नंदिनी व अभिजित
या ' जोगां 'ना—

या नाटकाचा पहिला प्रयोग ' रसिकराज, पुणे ' या संस्थेतर्फे
बुधवार दि. ३० एप्रिल १९८६ रोजी रात्रौ ९॥ वाजता
बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे सादर करण्यात आला.

निर्माती : सौ. संपदा पानसे
नेपथ्य व दिग्दर्शन : भालचंद्र पानसे
नेपथ्यनिर्मिती : माधव जोशी
संगीत : विलास आडकर
प्रकाशयोजना : अनंत कान्हो
ध्वनीसंयोजन : शशिकांत कुलकर्णी
रंगभूषा : माधव थत्ते
वेशभूषा : रवि साठे
प्रसिद्धी : महावीर पब्लिसिटी
प्रसिद्धी संकल्पना : शिवराज गोर्ले
डिझाईन्स : कुमार गोखले
रंगमंच व्यवस्था : धनराज आणि मंडळी
व्यवस्था : वसंत आचार्य

**कलाकार**

दादा देशपांडे : मोहन जोशी
सुनीता : वैशाली जोशी
माणिक : नयन जोशी
अतुल : आनंद अभ्यंकर
प्रभाकर : प्रकाश यादव
मिस्टर बापट : कुमार दिवे
लीला बापट : पद्मा भट
अलका : वनमाला साठे

---

नाट्यपरीक्षण मंडळाने प्रमाणपत्र क्रमांक DRM/ ४७३/ १९८६ दि. २३-४-८६ द्वारे मंजुरी दिली आहे.

या नाटकाचा व्यावसायिक, हौशी किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा प्रयोग करण्यापूर्वी, श्री. शिवराज गोर्ले, ३५५ सोमवार पेठ, पुणे ४११ ०११ यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

‘ संशयकल्लोळ ’ आणि ‘ शारदा ’ या नाटकांच्यानंतर, इतक्या सहज-सुंदर संवादांमधून व घटनांमधून निखळ विनोद साधणारे असे नाटक फार दिवसांनी रंगभूमीवर येत आहे. लेखकाचे मनःपूर्वक अभिनंदन.

**पद्मश्री– दाजी भाटवडेकर**
मुंबई

## ऋणनिर्देश–

खऱ्या अर्थानं व्यावसायिक रंगभूमीवर आलेलं हे माझं पहिलंच नाटक. त्याचं श्रेय अर्थातच; 'रसिकराज' या संस्थेचं. हे नाटक लोकप्रिय होण्यासाठी त्याला आकर्षक पद्धतीने पेश करण्याची कल्पना दिग्दर्शक भालचंद्र पानसे यांची! नाट्यसंहितेत काही उपयुक्त सूचना श्री. अनंत कान्हो यांनी केल्या आणि नाटक निघत असताना श्री. विजय जोशी यांनीही आपुलकीनं मदत केली.

रंगभूमीवर प्रथमच फायबरग्लासचा सेट आणण्याची श्री. पानसे यांची कल्पना मूर्त स्वरूपात आणण्यासाठी, मित्रवर्य-माधव जोशी यांनी अहोरात्र परिश्रम केले. श्री. विलास आडकर यांनी नाटकाचा बाज ओळखून नेमके संगीतच वापरले.

हे सारं घडलं-नाटक रंगमंचावर जाण्याअगोदर. नंतर मात्र हे नाटक खुलवलं ते मोहन जोशी, आनंद अभ्यंकर, कुमार दिघे, नयन जोशी, आणि मंडळींनी. पुढे स्वरूपकुमारनेही प्रमुख भूमिकेत नव्याने रंग भरला. पण खरं श्रेय मी सहज निखळ विनोदासाठी लिहिलेल्या या नाटकाला अक्षरशः डोक्यावर घेणाऱ्या नाट्यरसिकांच्या अभिरुचीचं. पुणेरी 'टिंगलम्' पुण्यात तर शेकडो प्रयोग करून चालूच आहे; पण सोलापूर, कोल्हापूर आदी ठिकाणी, कंत्राटदार श्री. बागवान यांच्या प्रसिद्धीच्या झपाट्याने, या नाटकाने अनेक रेकॉर्ड्सही मोडली आहेत. हे झालं नाटकाचं.

हे नाटक पुस्तकरूपानं आपल्यासमोर आणण्याचं श्रेय माझ्या वडिलांचे स्नेही श्री. दत्ताजी कुलकर्णी यांचंच! आणि अर्थात प्रकाशकांचंही!

—लेखक

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
वा. क्र. 22856 नों. दि. 22/8/88
वि. 0120 क्र. ..................

# प्रस्तावना–

' टिंगलम् ' हे माझं व्यावसायिक रंगभूमीवर आलेलं पहिलं नाटक. मराठीतील काही मान्यवर निर्मात्यांनी व कलाकारांनी नाकारलेलं हे नाटक – आज चारशे प्रयोग करूनही त्याची लोकप्रियता टिकून आहे.

' टिंगलम् 'च्या यशानं माझा आत्मविश्वास तर वाढलाच; पण मराठी रसिकांच्या अभिरुचीवरचा माझा विश्वासही दुणावला. ' चांगली नाटके चालत नाहीत ' या तक्रारीशी मी सहमत नाही. ' इतर ' नाटके चालतात – काही चांगली नाटके पडतात– हे खरे असले तरी, ' चांगले नाटक चालू शकते ' ही माझी श्रद्धा आहे. मात्र त्यासाठी लेखनाबरोबरच दिग्दर्शन– नेपथ्य– संगीत– अभिनयापासून, प्रसिद्धी– व्यवस्थापन अशी अवघी भट्टी जमावी लागते. केवळ चालतात म्हणून जुन्या चलनी नाटकांचे पुनरुज्जीवन करण्यापेक्षा; नवी चांगली नाटके काढून ती चालविण्याचे आव्हान– निदान आर्थिक ताकद असलेल्या निर्मात्यांनी स्वीकारले पाहिजे, एवढेच ' टिंगलम् 'च्या निमित्ताने सांगावेसे वाटते.

३५५ सोमवार पेठ
पुणे ४११०११

शिवराज गोर्ले
१७ डिसेंबर, १९८७

शिवराज गोर्ले यांची रंगमंचावर आलेली अन्य नाटके

ह्योच माझा बाप
गोलमाल
बुलंद
नवरा सांगा कुणाचा

आगामी :

धम-धमाका
अनैतिक
प्रिया बावरी
गोडीगुलाबी
खट्याळ काळजात घुसली

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. २२४५७ नों. दि. २२।८।९९
वि. ...२।९५ क्र. ............

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

( पडदा उघडण्यापूर्वी प्रथम मंगलाष्टके ऐकू येतात —

‘ गंगा, सिंधु, सरस्वतीचयमुना, गोदावरी, नर्मदाऽऽ ’
‘ कट्ट ’ असा आवाज–त्यानंतर त्याच चालीत ‘ टिंगलाष्टके ! ’
‘ मंदा, इंदु, सरस्वतीचरजनी, श्वेतांबरा, सारिका,
आल्या सांगून चार ज्या मज मुलीऽ त्यातून ही ठर्वता
घेतो चक्क जरा समाजरितीने हुंडा बरा मोजका
होई मंगल कार्य हो चंगळम्–कुर्यात सदा टिंगलम् !
कुर्यात सदा टिंगलम् ! ’

आवाज–‘ अरे, वाजवा रे ऽ वाजवा ’–मग बॅण्डचा आवाज...
पडदा उघडतो. एका सीनिअर सरकारी अधिकाऱ्याचा दिवाणखाना. उजवीकडे किचन व डावीकडे बेडरूम्स. प्रवेशद्वार डावीकडेच व समोर दर्शनीभागी– मागे, गार्डनमध्ये जाण्यासाठी द्वार–पडदा. सत्तरी ओलांडलेले; पण अतिशय उत्साही व मिस्किल दादा देशपांडे प्रवेश करतात. )

दादा : ( प्रेक्षकांना ) नमस्कार... नमस्कार मंडळी, अरे वा– बरीच निमंत्रित मंडळी जमलेली दिसताहेत... हां हां... बसा... बसा, उशीर झाला म्हणून संकोच करण्याचं कारण नाही. आपल्या घरचंच कार्य आहे... आपल्या स्वागताची अगदी जंगी तयारी केलेली आहे. माझ्या घरातली एकजात सगळी मंडळी, अगदी नटून–थटून आपल्या स्वागतासाठी जय्यत तयार आहेत... वाजंत्री आहे, गाणी आहेत, एवढंच काय; महाराजा, नाचदेखील आहे. तेव्हां जागचं हलायचं नाही ! –हां, आता मध्यंतरात पाय मोकळे करण्यासाठी बाहेर चहापानाची व्यवस्था केलीय– झालंच तर; बटाटे-

वेडे आहेतच– पैसे द्यायचे आणि विकत घ्यायचे, घरचं कार्य म्हणून संकोच करायचा नाही. (फोन वाजतो) एक मिनिट हं, मंडळी, जरा फोन घेतो. (फोनवर) हॅलो... हो हो देशपांडे! नाही... तुम्हाला कोणते देशपांडे हवेत ?...नाटकातले देशपांडे ? अहो, मग नाटकात फोन करा! काय ? – नाटकातच फोन केलाय, अहो, हे घर आहे आमचं– कॉसबार आहे– नाही कळलं, रॉंग नंबर आहे... आं! काय ? अजून नाही कळलं... फोन ठेवायचा कळतो का ? मग ठेवा. (फोन ठेवत हसतात) खवळला गडी ! काही म्हणा, मंडळी, हल्ली हे नाटकाचं फॅड फार वाढत चाललंय.

(तेवढ्यात सुनीता– दादासाहेबांच्या सूनबाई– चाळिशीच्या आसपास- सोज्वळ चेहरा– हातात चहाचा कप घेऊन प्रवेश करतात.)

सुनीता : दादासाहेब, चहा !

दादा : चहा ! वा सूनबाई– ही वेळच अशी आहे की, चहाच पाहिजे. (एकाएकी उठून उभे राहून रुबाबात मिशीवर हात फिरवीत, जाहिरात स्टाईलमध्ये) हा पहा आला ऽऽ

सुनीता : आं ?

दादा : लिप्टन टायगर चहा ! वाघांसारख्या मर्दासाठी– कडक चहाचा पुरेपूर आस्वाद– लिप्टन टायगर चहा. (दोघे हसतात. दादा चहा पितात.) –धिस पार्ट ऑफ द प्रोग्रॅम वॉज ब्रॉट टु यू बाय– लिप्टन टायगर चहा !

सुनीता : इश्श्य– दादासाहेब, तुम्हालाही टीव्हीनं अगदी पछाडलेलं दिसतंय !

दादा : काय करणार सूनबाई– सकाळ, संध्याकाळ बळजबरीनं ऐकावा लागतो ना... आपला अतुल दिसत नाही !

सुनीता : तो अजून ऑफिसमधून आला नाहीय.

दादा : आणि आपली मुक्ताबाई ?

सुनीता : मुक्ताबाई ?

दादा : म्हणजे आपली स्त्री–मुक्ती हो !

सुनीता : (हसत) माणिक म्हणताय होय– तिचा म्हणे आज मोर्चा आहे कुठेतरी.

दादा : वा... म्हणजे आज काहीतरी खमंग बातमी ऐकायला मिळणार– काढा, काढा म्हणावं– महिलांनो, मोर्चे काढा– त्याशिवाय आपला भारत देश सुधारणार नाही– (सुनीता आत जाते. दादा पेपर उचलून आरामखुर्चीवर बसत) सकाळ... संध्याकाळी वाचायचा ! काय म्हणतो सकाळ ? पंत-प्रधानांचा पक्ष बदलण्याचा विचार ?– वा ! पंजाबात चार अतिरेक्यांनी दहा पोलिसांना पकडले ! शाब्बास ! (पाने उलटत) कोल्हे-लांडगे शुभ-विवाह ! ...मुलं कशी व्हायची ? मुंबईत बँकेवर दरोडा– दरोड्याच्या

ठिकाणी पोलिसांचा दारू पिऊन धिंगाणा! –भारताचा इंग्लंडवर पाच गडी राखून विजय? विजय... काहीतरी छापण्यात चूक झालेली दिसतेय. –लंडनला भटजी हवेत! आं...? सूनबाई– अहो सूनबाई, ही बातमी पाहिलीत का? (सुनीता येते.) हे बघा, 'लंडनला स्मार्ट भटजी हवेत!'

सुनीता : इश्श्य, मग ती बातमी पुण्याच्या पेपरात कशाला देतील!

दादा : वा! पुण्यासारखे जातिवंत भटजी दुसरीकडे कुठून मिळणार?

सुनीता : पण मी म्हणते, लंडनला भटजी हवेतच कशाला?

दादा : बटुंच्या मुंजीकरता– (वाचत) हे बघा– 'लंडननिवासी बटुंच्या मुंजीकरता स्मार्ट सेल्सगर्ल्स पाहिजेत.'

सुनीता : सेल्सगर्ल्स?

दादा : चुकून खालच्या जाहिरातीवर गेलो. हं–'लंडननिवासी बटुंच्या मुंजीकरता स्मार्ट भटजी हवेत. इच्छुक भटजींनी पासपोर्ट– फोटोसहित अर्ज करावेत. फोटोत जानवे दिसणे आवश्यक!'

सुनीता : इश्श्य–पासपोर्टच्या फोटोत तर दोन्ही कान दिसावे लागतात ना?

दादा : कानावर जानवे असल्यास हरकत नसावी. (हसतात)

सुनीता : चला!...लंडनला गेल्यावर कोण मुंज करतंय? तिकडे मुलं काय गोटा करून का हिंडणार?

दादा : अहो, त्यात तर खरी मजा आहे. समर्थांनी म्हटलंच आहे,– लंडनमध्ये करिता गोटा- आनंदा नाही तोटा. जय जय रघुवीर समर्थ!

सुनीता : उगाच काही तरी शेंड्या लावू नका, दादासाहेब. हे समर्थांनी नाही– तुम्हीच रचलेलं दिसतंय.

दादा : पण जाहिरात तरी खरी आहे की नाही?

सुनीता : तुमचं काही सांगता येत नाही, मनचंदेखील वाचून दाखवाल. म्हणे– भटजींचे फोटो पाठवावेत. भटजींचा फोटो हो कशाला हवा?

दादा : सूनबाई, लंडनमध्ये वाढलेली पोरं ती. त्यांना स्मार्ट भटजी लागतो. आमच्या- सारखा तेलकटतुपकट थोडाच चालणार आहे?

सुनीता : इश्श्य–म्हणजे ती मुलं फोटो पाहून का भटजी पसंत करणार?– काहीतरीच! आणि लंडनला गेल्यावर कोण मुंज करतंय. हां, आता पुण्यात सुटीला आल्यावर केली मुंज; तर गोष्ट वेगळी!

दादा : सगळं कुटुंब पुण्यात आणायचं म्हणजे खर्चाचं काम, सूनबाई! त्यापेक्षा एक भटजी इकडून तिकडे नेणं केव्हांही परवडणार. आता पुण्याचा भटजी असेल, तर चारदोन लाडू जास्त खाईल, एवढंच!

सुनीता : म्हणजे दादासाहेब, लंडनला भटजी 'इंपोर्ट' करतात म्हणा की!

दादा : भटजीच काय; जानवीसुद्धा इंपोर्ट करतात. नाहीतर आयत्या वेळी जानवं-

सुद्धा ब्लॅकनं घ्यावं लागतं !

सुनीता : दादासाहेब, तुम्ही अगदी लंडनला राहून आल्यासारखंच बोलताय.

दादा : राहून आलो नाही. पण जाण्याचा मात्र विचार आहे !

सुनीता : अगंबाईऽऽ– तुम्ही कधी जाताय लंडनला ? आणि कुणाबरोबर ?

दादा : आता या वयात मी कुणाबरोबर जाणार ? एकटाच जाणार !

सुनीता : अय्या, पण कशासाठी ?

दादा : कशासाठी ? (उठत) हा मात्र प्रश्न आहे. हां, कीर्तन करण्यासाठी !

सुनीता : कीर्तन करण्यासाठी–लंडनमध्ये ?

दादा : अहो, मग या वयात मी काय ब्रेकडान्स करणार ?

सुनीता : अहो, पण लंडनमध्ये तुमचं कीर्तन ऐकणार कोण ?

दादा : साहेब,– साहेब ऐकणार ! सूनबाई, अहो, आपल्याला जसा त्यांचा डिस्को डान्स–ब्रेक डान्स आवडतो, तसा त्यांना आपला तमाशा आवडतो, कीर्तन आवडतं ! शिवाय तिकडं स्थायिक झालेली आपली मराठी मंडळी आहेतच की. तुम्हाला सांगतो सूनबाई, ही मंडळी इथं असताना साधी संध्या करायला लाजतील. पण एकदा तिकडे गेल्यावर मुंजी काय, मंगळागौरी काय ! धर्माला नुसता ऊत येतो ! अहो, हल्ली लंडनला जायला; फाडफाड इंग्रजी यावं लागत नाही.

सुनीता : अगंबाई, मग ?

दादा : त्याला ते; लोकनाट्य यावं लागतं, कथ्थक बिथ्थक यावं लागतं. कीर्तन यावं लागतं. आता यांतलं मला काय जमणार–कीर्तन ! ( गाऊ लागतात )

आप जैसा कोई मेरी जिंदगीमें आये
तो बात बन जाये– आहाऽ बात बन जाये !

सुनीता : इश्श्य. हे काय कीर्तन झालं ?

दादा : हेच परमेश्वराला उद्देशून म्हटलं की झालं ! (नाचत पुन्हा)

आप जैसा कोई मेरी जिंदगीमें आये
तो मोक्ष मिल जाये–आहाऽ मोक्ष मिल जाये ॥
देवा तुझे फार, थोर उपकार
अमुच्यावरी आहेत अपार
प्रत्येकाचा तू, कर बेडा पार
तूच आता अमुचा बाप आणि आयेऽऽ
आहाऽ बाप बन जाये ॥

( फोन वाजतो. दादा 'टीव्ही निवेदिकेच्या' शैलीत )

सॉरी फॉर द इंटरप्शन– रुकावटके लिये हमें बहुत खेद है ।

(फोनवर) बोला...(मोठ्यानं) हॅल्लोऽऽ...हां हां देशपांडे...कुठून...लंडनहून ?... अरे बापरे– लंडनचा फोन !– मोठ्यानं बोला, ऐकू येत नाहीय... सुनीता देशपांडे ? आहेत, आहेत...सूनबाई, अहो, लंडनहून फोन आहे.

सुनीता : (कपडे नीटनेटके करीत) अगंबाई, लंडनहून फोन– मला ? (फोनवर) हॅल्लो– (दादासाहेबांना) दादासाहेब, काय म्हणायचं ?

दादा : श्री गणेशाय नमः, म्हणा ! अहो, नाव सांगा, मोठ्यानं बोला– लंडनहून फोन आहे !

सुनीता : (फोनवर मोठ्याने) हॅल्लोऽ...हां हां, सुनीता देशपांडे स्पीकिंग ! काय... लंडनहून– नाही, नाही, मी आपली पुण्याहून स्पीकिंग !

दादा : बोंबला !

सुनीता : (फोनवरच) काय– भांबुर्ड्याहून ?...असं होय– हो... नमस्कार. हे आले नाहीत अजून ?... तुमच्याकडेच गेलेत... हो, हो येतीलच इतक्यात ... ठेवते हं फोन. (घाम टिपत, कृतक कोपानं दादांकडे पाहात) काय हे, दादासाहेब, केवढं घाबरवलंत मला. म्हणे लंडनहून फोन आहे.

दादा : मग कुठून होता ?

सुनीता : भांबुर्ड्याहून तर होता ! आणि तुम्ही थेट लंडन जोडून दिलंत.

दादा : पण मी तर 'लंडन' ऐकलं !

सुनीता : अहो, ते बापट आलेयत् लंडनहून– ते बोलत होते भांबुर्ड्याहून.

दादा : लंडनहून निघाले ते थेट भांबुर्डे ? ही नवीन एअरलाईन केव्हांपासून निघाली बुवा ?

सुनीता : अहो, त्यांचे कुणी नातेवाईक असतात भांबुर्ड्याला. हे त्यांना आणायलाच तर गेलेत.

(वेल वाजते. सुनीता दार उघडते– विशीतील माणिकचा प्रवेश. हातात एखादा 'स्त्रीमुक्ती' चा फलक)

दादा : या, मुक्ताबाई !

माणिक : (हात उंचावून) स्त्रीमुक्ती चळवळीचा–

दादा : विजय असो !

माणिक : पुरुषप्रधान संस्कृतीचा–

दादा : विजय असो !

माणिक : काय ? –

दादा : आपलं...धिक्कार असो !

माणिक : (फलक ठेवून पळत दादांकडे जात) अशी मज्जा आली, दादा, आम्ही

स्पर्धा बंदच पाडली. सौंदर्यस्पर्धा! ब्यूटी कॉन्टेस्ट– आम्ही बंदच पाडली.

सुनीता : आजकालच्या पोरींना सगळं फक्त बंद पाडायला सांगा!

दादा : खरंय. सगळं बंद, पोरी फक्त 'चालू'!

माणिक : मोर्चा असा 'सॉलीड' झाला! अगं आई, स्पर्धेत भाग घेणाऱ्या पोरींनी चक्क पळ काढला, पळ...

दादा : म्हणजे अगदी नेसत्या वस्त्रांनिशी?

माणिक : मग काय!

दादा : पण वस्त्रं नेसली होती ना? नाही- सौंदर्यस्पर्धा होती म्हणून म्हटलं.

माणिक : काय बिशाद आहे परत भाग घेतील स्पर्धेत!

दादा : पण पोरी कशा होत्या?... आजकाल चांगल्या पोरी बघायलाच मिळत नाहीत.

माणिक : आम्हाला काय माहिती! आम्ही पोरांकडं बघत होतो.

सुनीता : माणके, अगं, काही वाटतं का सांगायला?

माणिक : अय्याऽऽ, तसं नाही. अगं, काही टारगट पोरं आमच्यासमोर आगाऊपणा करत होती. राणेबाई म्हणाल्या, 'चांगलं बघून घ्या पोरांकडं.'

दादा : अस्सं. म्हणून तुम्ही 'बघत' होता! गुड!

माणिक : ए आईऽ, एक कप चहा...प्लीज.

दादा : सूनबाई, तुम्हाला काही चहामुक्ती नाही.

(सुनीता हसत आत जाते)

दादा : पण माणिक, तुझं सौंदर्याशी वाकडं असायचं कारण काय?

माणिक : (आवेशाने) आमचं भांडण सौंदर्याशी नाही दादा–

दादा : (त्याच टोनमध्ये) सौंदर्याच्या बाजाराशी आहे!

माणिक : अर्थात!

दादा : माणके, मला एक सांग. एक तू सोडलीस तर, तुमच्या मोर्चात चिकण्या पोरी किती होत्या? (जीभ चावत) सुंदर मुली किती होत्या?

माणिक : आमचा मोर्चा म्हणजे निदर्शन होतं दादा, सौंदर्याचं प्रदर्शन नव्हे.

दादा : क्या बात है! एकूण काय, तुम्हांला शरीराचं प्रदर्शन मान्य नाही–

माणिक : बिलकूल नाही.

दादा : बरं, मग तुला उद्यापण मोर्चा काढावा लागणार.

माणिक : (उत्साहाने) उद्या काय आहे, दादा?

दादा : पुरुषांची शरीरसौष्ठव स्पर्धा. तेही शरीराचं प्रदर्शन नाही का?

माणिक : असेल. पण तिथं बायका जात नाहीत; वखवखलेल्या नजरांनी बघायला!

दादा : बायकांना बंदी असते का? आता त्यांचं धाडस होत नाही, हा भाग वेगळा.

माणिक : पण असं कसं म्हणता, दादा, शरीरसौष्ठव हे कमवावं लागतं.

दादा : मग सौंदर्य काय फुकट येतं ते कमवावं लागत नाही, जपावं लागत नाही ? माणके, मला तर वाटतं–स्पर्धेत सौंदर्य प्रेझेंट करणं हीसुद्धा एक कला आहे.

माणिक : पण बघणारे काही कला बघायला येत नाहीत. भकंस कुठले !

दादा : खजुराहो बघायला जाणारेही सुगळेच कला बघायला जात नाहीत– म्हणून शिल्पं फोडायची का ?

माणिक : तुम्ही आम्हांला बोलण्यात ऐकणार आहात का ?

दादा : बरं, ही झाली उद्याची स्पर्धा. परवाची स्पर्धा आहे पोरांची ! सुदृढ बालक स्पर्धा.

माणिक : मग काय–तिथं मोर्चा नेऊ आम्ही ?

दादा : अगं, सुदृढ बालक स्पर्धा म्हणजे; गुटगुटीत शरीरांचं प्रदर्शनच की नाही ?

माणिक : काहीतरीच काय बोलता, दादा ?

दादा : माणिक, जर मुलांचं गोंडस शरीर बघणं गैर नाही, पुरुषांचं शरीरसौष्ठव बघणं गैर नाही; तर स्त्रियांचं कमनीय सौंदर्य बघणं, हेच तेवढं गैर कसं ? है कोई जवाब तुम्हारे पास ?

माणिक : नहीं, नहीं ! (सुनीता चहा आणून माणिकला देते. फोन वाजतो.)

दादा : सूनबाई, आता मात्र नक्की लंडन.

माणिक : अय्या,– लंडनचा फोन !

सुनीता : उगाच चेष्टा करू नका हं, दादासाहेब.

दादा : मी आवाजावरून सांगतो. नक्की लंडनचा आहे. घ्या.

सुनीता : (फोनवर) हॅल्लोऽऽ...अं ? कोण ?...प्रभाकर ?– नाही ते घरी नाहीत. बाहेर गेलेत... आं ? काय ? (हसते) अय्या, तुम्हीच बोलताय होय ? अहो, असं काय करता, आवाज नाही ओळखू आला ! ... अहो, पोहोचलात का एकदाचे...काही सांगू नका तुमच्या गाडीचं...बरं– आता तरी लवकर या. (फोन ठेवते)

दादा : काय हे सूनबाई, इतकी वर्षे संसार केलात– अजून नवऱ्याचा आवाज ओळखता येत नाही ?

माणिक : कसा ओळखू येणार, दादा– आई बोलूनच कुठे देते बाबांना !

सुनीता : माणके—

माणिक : लग्नानंतर आईनं बाबांचा आवाज पार बंदच करून टाकलाय !– असं मला बाबाच म्हणत होते. आईशप्पथ ! (दोघे हसतात)

सुनीता : दादासाहेब, हे पोचले बाई एकदाचे !

दादा : पोचले का ?

सुनीता : अहो, भांबुर्ड्याला. माणके, ती बापट मंडळी आठ दिवस राहायलाच

यायचीत आपल्याकडं.

माणिक : कोण बापट ?

दादा : लंडननिवासी बापट. सध्या मुक्काम भांबुर्डे.

सुनीता : यांचे चांगले मित्र आहेत ते.

माणिक : मग आम्ही कधी पाहिले नाहीत ते ?

सुनीता : अगं, दिल्लीला होते ते,...नंतर लंडनला गेले. आताही महिन्याभरासाठीच आलेयत म्हणे.

दादा : माणके, बापटांची मजा आहे नाही ? आधी दिल्ली, मग एम्बसी! त्यांची बायको नळावर बाकीच्या बायकांना अगदी टेचात सांगत असेल नाही —' आमचे हे किनई लंडनला असतात म्हटलं!'

सुनीता : इश्श्य. अहो, त्या कुठं इथं नळावर पाणी भरतायत. ते स्थायिकच झालेत तिकडे— एम्बसीत!

दादा : एम्बसीत स्थायिक झालेत— काय वॉचमन आहेत काय ?

सुनीता : माणके, तुझे ते फलक उचल पाहू आधी— आणि आता संपले की नाही तुझे मोर्चे ?

माणिक : (फलक उचलून आत जात) पुढच्या रविवारी शेवटचा!

सुनीता : आता कुठं मोर्चा काढणार आहात ?

माणिक : डेक्कनवरच्या पोस्टरवर!

सुनीता : पोस्टरवर मोर्चा ?

माणिक : अगं आई, अश्लील पोस्टर काढून टाकावं, म्हणून मोर्चा काढणार आहोत आम्ही.

दादा : (उत्साहाने उठत) माणके – माणके – इकडे ये, (माणिक फलक आत ठेऊन, 'आले' करीत येते. दादा सूनबाईंना : 'तुम्ही चला आत, बापट यायचेत ना!' सुनीता जाते) कुठलं पोस्टर गं ?

माणिक : ते, अंधा मारे ऑंखचं! का ?

दादा : नाही, तुम्ही काढायच्या आत मी एकदा बघून येतो!

माणिक : शीऽ! तसलं पोस्टर काय बघायचं ?

दादा : का— तुम्ही पाहिलंतच की!

माणिक : आम्ही तरी कुठं पाहिलंय ?

दादा : मग तुम्हाला कसं कळलं— ते अश्लील आहे हे ?

माणिक : राणेबाई म्हणाल्या!

दादा : म्हणजे त्या डुचकीनं तरी पाहिलंच की नाही ?

माणिक : त्या नेहमीच पाहतात! एखादं अश्लील पोस्टर सापडतंय का बघायला—

दादा : वा! चांगली हुषार दिसतेय तुमची राणेबाई! सगळी चांगली चांगली कामं

स्वतःकडे घेतलीत. तुला सांगतो, माणके, ही अशी चांगली चांगली कामं मला देणार असलात ना, तर मीसुद्धा सामील होईन तुमच्या स्त्रीमुक्ती चळवळीत!

माणिक : इश्श्य!

दादा : आं! काय म्हणालीस?

माणिक : इश्श्य!

दादा : वा...वा...कानाला कसं अगदी; जुनी हिंदी गाणी ऐकल्यासारखं गोड वाटलं बघ. हल्ली या तुमच्या चळवळी सुरू झाल्यापासून, तुमचे ते 'अय्या' आणि 'इश्श्य' अगदी पेट्रोलपेक्षा महागलंय! (आतून सुनीता येत 'इश्श्य' म्हणते) हे बघ, असं पाहिजे. या बायकांचं कसं सटासट शिंका याव्यात तसं चाललेलं असतं–अय्या...इश्श्य–अय्या–)

सुनीता : इश्श्य!

दादा : हां– ये ऐसा मंगता है हमकू!

माणिक : (वेडावत) हॉं–म्हणे ऐसा मंगता है हमकू. काय हो दादा, तुम्ही पुरुष तरी कुठे हातभर लांब मिशा ठेवता पूर्वीसारख्या?

दादा : अगं, हातभर सोड– टीचभर ठेवल्या तरी त्याचा बायकांना त्रास होतो म्हणे. तुझ्या त्या राणेबाईला विचार!

(तेवढ्यात बेल वाजते. अतुलचा प्रवेश–तेवीसचोवीस. दिसण्यात टाकटीक. पण काहीसा शांत, भोळसर. हातात रुमालात बांधलेला अर्धा नारळ. थोडा थकलेला.)

दादा : या, अतुलशेट!

सुनीता : अरे, हे काय आणलंयस?

अतुल : खोबरं!

दादा : खोबरं? कुणाच्या अक्लूचं?

अतुल : दादा, आज आमच्या कंपनीत नवीन कॉम्प्युटर आणला. त्याबद्दल नारळ फोडला होता.

दादा : तो उचलून तू घरी घेऊन आलास! अगदी बापाच्या वळणावर गेलायस. सूनबाई, आज फर्स्टक्लास चटणी करून टाका खोबऱ्याची– टेम्कोच्या सौजन्याने.

माणिक : ॲऽ हॅऽ रे. म्हणे कॉम्प्युटरला नारळ फोडला. कॉम्प्युटर म्हणजे काय म्हसोबा आहे, नारळ फोडायला?

दादा : तुला कल्पना नाही, माणके, हे भारतातले कॉम्प्युटर मोठे चावट असतात. त्यांना नारळ, उदबत्ती, फुलं वाहिल्याशिवाय चांगलं आऊटपुटच देत

नाहीत ते.

अतुल : तसं नाही, दादा.

माणिक : (वेडावत) मग कसं दादा ?

अतुल : तू चप ए ! शेवटी श्रद्धेचा काही भाग असतोच्च की नाही ?

दादा : प्रश्नच नाही ! मग पूजा वगैरे झाल्यावर एखादं स्तोत्र म्हटलं की नाही– मनोजवं मारुततुल्यवेगं–

माणिक : ( चेष्टेने ) कॉम्प्युटरं बुद्धिमतां वरिष्ठं.

( दोघे हसून टाळी देतात. सुनीता येते )

सुनीता : अतुल, तू नको त्यांच्या नादी लागू. तू बॉश घेऊन ये बरं. मी दूध गरम करते.

( अतुल बॉश घ्यायला जातो. त्याला अडवून माणिक )

माणिक : ए, चालला लगेच ! आधी मी बॉश घेणार ! लेडीज फर्स्ट.

(माणिक पुढे पळते. पाठोपाठ अतुल आत जातो. सुनीताही आत जाते.)

दादा : ( हसत प्रेक्षकांना ) याला म्हणतात स्त्रीमुक्ती ! एरव्ही समान हक्क– स्वार्थ असेल तिथे लेडीज फर्स्ट ! आता विहिरीत उडी टाकायची असती, तर नसती म्हणाली– लेडिज फर्स्ट. (फोन वाजतो) टेलिफोन फर्स्ट. ( फोनवर ) हॅलो; –काय, आमचा नकार कळला ? अहो, आम्ही कधी नकार कळवला ?... आं ! मुलगी खुजी आहे ? ( हसत )मग जरा खतपाणी घाला; उंची वाढेल. .. अहो, कोण हवंय तुम्हाला – लग्न धुमधडाक्यात करू– करा ना– मुलामुलींना माझा आशीर्वाद सांगा– अहो, मी देशपांडे– हॅलो ! (फोन ठेवतो. हसत )– आता या वयात मी काय करू खुजी मुलगी बघून ?

(आतून माणिक पळत बाहेर येते. तिच्या हातात एक पुस्तक व चेस्ट एक्स्पान्डर. पाठोपाठ ' माणिक ' करीत अतुल बनियनवर येतो. )

अतुल : माणिक, ते इकडं दे अगोदर.

दादा : मारामारी मत करो ! अतुल, काय रे, तू बनियनवर काय एन्ट्री घेतलीस ?

अतुल : ( जीभ काढून, दचकत ) ऑं ?...मी शर्ट घालून येतो. ( आत जातो)

माणिक : ( स्प्रिंग पुढं धरत ) दादा, हे काय आहे ?

दादा : तुला माहिती नाही ?...मला तरी कुठं माहितीय. बघू. ( हातात घेऊन किंचित ताणत ) माणके, मला वाटतं, हा छाती फुगवण्यासाठीच चेस्ट एक्स्पान्डर असावा...(आणखी ताणतात.)

माणिक : हळू , हळू.

दादा : हळू, हळू नाही, माणके, जास्त ताणलं की तुटतं, या तत्त्वावर आधारित

आहे ते.

माणिक : दादा, हा व्यायाम काय चोरून करावा लागतो ?

दादा : अगं, म्हणजे छातीही गुपचूप वाढते !

माणिक : अच्छा, तरीच हा मिनिटामिनिटाला आरशासमोर उभा असतो–छाती फुगली का बघत.

(अतुल शर्ट चढवून येतो)

अतुल : (वेडावत) तुझ्यासारखे आरशात बघून तासंतास नखरे करत नाही मी !

माणिक : अरे हुट् ! मी कशाला आरशापुढं बसतेय. मला माहितीय मी कशी दिसते ते.

अतुल : आहे, माहिती आहे– फार चांगली दिसतेस ते.

माणिक : चांगली ? ' चिकणी ' म्हण.

दादा : अगं– माणके,

माणिक : त्याचे मित्र काय म्हणतात विचारा. कालच तो ढापण्या म्हणत होता, ' अतुलची बहीण काय चिकणी दिसते ' म्हणून.

दादा : माणके, अगं, असलं आपण ऐकू नये.

माणिक : पण मी ऐकावं म्हणूनच बोलला तो. दादा, याच्या कंपनीतले सगळे झंपक, आमच्या कॉलेजवर एकजात घोटाळत असतात.

अतुल : चप ए. कोण घोटाळतंय– त्यांना काय कामधंदे नाहीत ?

माणिक : असतात की– आठवडाभर काम आणि गुरुवारी धंदे – लाइनी मारायचे. बरं का दादा, याचे ते इंडस्ट्रियल पडीक, दर गुरुवारी आमच्या कॉलेजवर हजेरी लावत असतात. माझी सकाळची लेक्चर्स संपली, की बरोब्बर यांच्या स्कूटर्स लागतात कॉलेजबाहेर.

अतुल : तू बघतेस कशाला त्यांच्याकडं ? तू बघतेस कशाला– अँ ?

दादा : वा...असं कसं – अरे, दर्शनासाठी आलेल्या भक्तगणांना एखादा कृपाकटाक्ष नको ? वेडा कुठला.

माणिक : नाहीतर काय ! बिचारे–सुट्टीच्या दिवशीसुद्धा दाढ्या घोटून येतात कॉलेजवर.

अतुल : माणके, ते पुस्तक दे.

माणिक : थांब. कसलंय ते तर बघू. वा ! चांगलं कव्हरबिव्हर घातलंय. (कव्हर काढू लागते.)

अतुल : माणके, ते मुलींनी वाचण्यासारखं नाही. इकडं दे.

(पुस्तकासाठी पळापळ– ओढाओढी. माणिक दादांकडे पुस्तक देते)

दादा : मुलींनी वाचण्यासारखं नाहीय ? मग मुलांनी तरी वाचण्यासारखं आहे ना ? मग मी तर केवढा मोठा मुलगा आहे.–अरे वा, कव्हर तर गुलाबी दिसतंय– नाव बघू– ' बाई पुरुषात काय पाहते ? '

माणिक : अय्या– काय पाहते, दादा ?

दादा : ए, मुलींनी वाचण्यासारखं नाहीय– तू मागं हो– ( खुर्चीकडे जात ) बघू तरी, काय पाहते ते–

अतुल : दादा, प्लीज– ते पुस्तक... फारसं चांगलं नाहीय!

माणिक : चांगलं नाहीय, मग तू तरी कशाला वाचतोस?

अतुल : तू गप ए, तुला काय करायचंय?

माणिक : ए– मग हे पुस्तक माझ्या कॉटखाली का लपवून ठेवलंस?

दादा : हे बरोबर नाही, अतुल. लपवायचंच होत, तर स्वतःच्या कॉटखाली लपवायचंस. नाहीतर माझ्या कॉटखाली लपवायचंस! माणिक, तू जा पाहू आत.

माणिक : जाते– अजून यानं काय काय लपवून ठेवलंय ते बघते मी. (अतुल तिच्या मागे धावतो. त्याला थांबवीत–)

दादा : माणिक गेली. आता तू आणि मी– दोघे मिळून वाचू, बाई पुरुषात काय पाहते ते! हेच पुस्तक तरुणपणी मिळालं असतं, तर चित्र काही वेगळंच दिसलं असतं. ( दादा बसून मोठ्याने वाचतात. ) भरदार छातीचे पुरुष स्त्रियांना आवडतात. काय; भरदार? म्हणून हा चेस्ट एक्स्पान्डर होय! (अतुल 'नाही नाही' करत चेस्ट एक्स्पान्डर जवळ घेत लजील )

अतुल : दादा,– प्लीज ते–

दादा : ज्या पुरुषाच्या छातीवर केस असतात, त्यांना स्त्रिया चटकन् वश होतात. अच्छा? काय रे, भरदार छातीसाठी हा एक्स्पान्डर ठीक आहे; पण तुझ्या छातीवर केस नाहीत, त्याचं काय? हां! डाबर आवळा तेल है सुगंधी, गुणकारी– केसांना करते काळे, लांब भारी. (उठून जवळ जात) मग– रात्री झोपताना छातीवर चोळतोस की नाहीस डाबर आवळा तेल, केस यावेत म्हणून? ( सुनीता येते )

सुनीता : केस यावेत म्हणून? कसले केस?

दादा : केस... नाही नाही...गेस्ट... गेस्ट. आपल्याकडे ते गेस्ट यायचेत, म्हणून आपली तयारी चाललीय ना– त्यांच्याशी कसं वागायचं, कसं बोलायचं ते अतुलला सांगत होतो. अतुल, अरे, असली पुस्तकं का वाचतोस तू– काही अडलं तर मला विचारत जा!

सुनीता : हो– अरे, काही अडलं तर दादांना विचारत जा– कसलं पुस्तक आहे, दादा?

दादा : गांधीजींचं आत्मचरित्र आहे! (अतुल दादांकडून पुस्तक घेऊन पळत आत जातो. दादा हसतात.) सूनबाई, कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे, की चिरंजीव अतुल आता लग्नाला आला आहे!

सुनीता : झालं. तुम्ही आता त्या बिचाऱ्याच्या मागे लागलात!

दादा : मी मागे लागण्याचा प्रश्नच नाही. तो पोरींच्या मागे लागण्याच्या आत;

आपण ठरवून मोकळं व्हावं.

सुनीता : एवढी काय घाई आहे ?

दादा : करायलाच हवी. गडी हातघाईवर आलेला आहे. तेव्हां; येणारा भाद्रपद सोडू नये ! चला, आता मला मुली बघत फिरायला हरकत नाही !

सुनीता : काय हे, दादासाहेब ?

दादा : अतुलसाठी म्हणतोय मी. तशा मी बघत असतोच, आता जरा जास्त बारकाईने पाहीन एवढंच.

सुनीता : दादा, तुम्हाला जरा मुलांच्या रूममध्ये शिफ्ट व्हावं लागेल–ती बापट मंडळी राहायचीत ना !

दादा : कशी, किती मंडळी आहेत बापटांची ?

सुनीता : तीन ! एक ते, त्यांच्या मिसेस आणि त्यांची मुलगी.

दादा : मुलगी ? क्या बात है. म्हणजे मुलगी अगदी चालत घरी येतेय म्हणायची !

सुनीता : झालं ! तुम्ही लगेच सुतावरून स्वर्गालाही पोचलात !

दादा : सूत सोडा– स्वर्ग सोडा ! जरा विचार करा. ही बापट मंडळी महिन्या-भरासाठी पुण्यात येतात, याचा अर्थ काय ? मी सांगतो सूनबाई. मुलीला कर्तव्य आहे ! म्हणजे महिन्याभरात मुलीचं जमलं, की हे लंडनला जायला मोकळे. शिवाय जाताना एका तिकीटाचा खर्च कमी– आडनाव ' बापट !' आहे, विसरलात ?

सुनीता : कमाल झाली बाई तुमची !

दादा : कमाल बापटांची आहे ! त्यांना माहितीय, आपला अतुल लग्नाचा आहे ते ?

सुनीता : झालं. तुम्ही अगदी जमवून मोकळे. अहो, अजून ती अलका काळी की गोरी माहिती नाही.

दादा : अलका ! नाव तर झकास आहे. आता प्रश्न राहिला रंगाचा. मी म्हणतो, मूळची काळी असली तरी, लंडनला राहून गोरी झाली असेलच की, सारखं बर्फ पडून पडून !

सुनीता : (हसत) तिला येऊ तर द्या !

दादा : वा ! असं कसं ? आपल्या बाजूनं सगळी तयारी हवी. अतुलच्या मुली-विषयीच्या अपेक्षा आपल्याला माहिती पाहिजेत. नाही तर काय, आपण त्यांच्याशी सीमाप्रश्नावर बोलणार आहोत का ! तेवढा फालतू वेळ आहे का आपल्याला ? (हाक मारीत) अतुल–ए अतुल—

( अतुल येतो )

दादा : या, अतुलशेट. बसा...अरे, बस ना. काय म्हणतेय तुझी नोकरी ?

अतुल : छान ! मजेत !

दादा : काही प्रमोशनचे चान्सेस वगैरे ?

अतुल : पुढच्याच महिन्यात आहेत.
दादा : तुला म्हणे बायको गोरी हवी ?
अतुल : हो ! ( भांबावून ) आं ?
दादा : नाही, म्हणजे गोरीच हवी, की 'फेअर ॲन्ड लव्हली' चालेल ?
सुनीता : मला बाई सून गोरी हवी !
अतुल : हो, म्हणजे काय आहे– पुढे मुलांच्या रंगाचा प्रश्न राहात नाही.
दादा : वा ! लग्नाच्या अगोदर मुलांची तयारी !
अतुल : नाही. म्हणजे मी आपलं एक सांगितलं.
दादा : बरं. तर तुला मुलं गोरी हवीत !
सुनीता : इश्श्य. मुलं काय– मुलगी गोरी हवी.
दादा : हां. गोरी पाहिजे. आणखी काय अपेक्षा आहेत ?
अतुल : तुम्ही सिरिअसली विचारताय का दादा ?
दादा : मग काय कामधंदा नाही म्हणून टाईमपास चाललाय काय ? तुझ्या आयुष्याचा प्रश्न आहे ना ! बोल– मुलगी गोरी हवी– आणखी कशी हवी ?
अतुल : ( किंचित लाजत ) देखणी हवी.
दादा : शाब्बास. अशी ठोस अपेक्षा पाहिजे. मुलगी देखणी हवी. चला, सूनबाई, निदान तुमची सून तरी देखणी येणार !
सुनीता : कळतात बरं असली बोलणी, दादासाहेब !
दादा : गंमत केली, सूनबाई. हं– बोला अतुलशेठ, पुढे ?
अतुल : मला लांब केस हवेत !
दादा : अरे, मग वाढव की– त्यात काय ?
अतुल : मला नाही...मुलीला.
सुनीता : अरे, पण आजकाल मुली लांब केस कुठे ठेवतात.
दादा : चला. म्हणजे अलका बापटचा बॉबकट असला तर तिचा पत्ता कट !
अतुल : ( बावचळून ) अलका बापट कोण ?
सुनीता : अरे, ती राहायला येतेय आपल्याकडे !
अतुल : राहायला ?
दादा : तू सरकू नकोस– सरळ बस.
अतुल : पण कोण ही अलका बापट ? कुठली ?
सुनीता : लंडनहून येतेय ती !
अतुल : ( उठून उभा राहात, हात वर करत, 'आ' वासत ) लंडनहून ?
दादा : अरे पण, तू उभा का, बस ना. (अतुल तसाच उभा ) बघा सूनबाई, म्हटलं नाही– मुलगा लग्नाला उभा आहे म्हणून ! (अतुल पटकन् खाली बसतो ) तेव्हां अतुलशेट, बघा जमतंय का ? स्थळ थेट लंडनहून चालत घरी येतंय.

याला म्हणतात– ' गंगा आली रे अंगणी. '

अतुल : पण– कसली गंगा ?

दादा : अरे, गंगा बापट.

सुनीता : (हसत) गंगा बापट नाही हं...अलका बापट.

दादा : अर्थात्; ती येतेय लंडनहून– म्हणजे लांब केसांचा प्रश्नच येत नाही.

सुनीता : असं काही नाही.

दादा : अहो, लंडनला विमानतळावर केस कापूनच आत सोडतात म्हणे...एनी वे ...बघू तर, या केसमध्ये काय होतंय ते.

अतुल : आणि– चष्मा नसलेला बरा.

दादा : तुला आहे त्याचं काय ? अरेच्या ! तुझा चष्मा गेला की काय ?

अतुल : नाही. घातलाय की.

दादा : म्हणजे ? तू आता चष्मा घातलायस– मला दिसत नाही तरी ?

सुनीता : दादा, अहो, हल्ली चष्मा डोळ्यांवर घालत नाहीत !

दादा : म्हणजे ? हल्ली जागा बदललीय काय ?

अतुल : कॉन्टॅक्ट लेन्सेस बसवल्यात मी.

दादा : शाब्बास ! म्हणजे तुझा चष्मा मुलीच्या डोळ्यांवर येऊ नये ! लग्नाची अगदी जय्यत तयारी दिसतेय तुझी. काही हरकत नाही. ही अलका बापट येऊ तर दे. (मांडी थोपटत)

अतुल : आई, गंमत म्हणजे– भास्कररावपण म्हणाले होते–

दादा : काय– अलका बापट येऊ दे म्हणून ?

अतुल : नाही, या महिन्यात येणारं प्रपोजल लकी ठरेल म्हणून.

दादा : अच्छा...ते भास्करराव होय– ज्योतिषबुवा... ?

अतुल : परवाच त्यांना हात दाखवून आलो मी.

दादा : बरं केलंस. या बुवाला कुणीतरी चांगला हात दाखवायलाच पाहिजे.

सुनीता : अरे, मग काय म्हणाले ते– लकी असेल म्हणजे ?

अतुल : म्हणजे, माझ्या दृष्टीनं चांगलं. ते म्हणत होते, ' योग आहे ' म्हणून.

दादा : ये हुई ना बात...सूनबाई, योग आहेच. तुम्ही फक्त 'सुयोग' मिळतंय का लग्नाला तेवढं बघा. चला, एकूण अलका बापटाचे स्टार्स जोरदार आहेत. आता फक्त तिचे केस लांब असले; की जमलं.

सुनीता : खरंच बाई– जमलं तर काय मजा येईल !

दादा : जमलं म्हणजे काय; जमवलंच म्हणून समज ! पण अतुल...आपलीपण एक अट आहे– लग्न लंडनला झालं पाहिजे ! ( अतुल टाळी देतो )

सुनीता : छान–तुमचं लंडन काही सुटत नाही.

दादा : हो, नाहीतर ' वऱ्हाड निघालंय लंडनला ' म्हणायचं आणि प्रयोग करायचे

पुण्यात ! हे जमायचं नाही. मस्त स्पेशल 'एस टी' करू– पुढं झकास पाटी लावू– 'देशपांडे–बापट मॅरेज पार्टी'– हॅट जाव !

सुनीता : (हसत) हो. एस्टीनं जायचं...लंडनला ! मला बाई, एस्टी लागते !

दादा : मग ट्रकनं जाऊ. नाहीतरी लग्नाची वऱ्हाडं जनरली ट्रकनीच नाही का जात ?... नाहीतर 'टॅम्पू' करू !

सुनीता : दादासाहेब, अहो आधी जमू तर द्यात.

दादा : म्हणजे काय ? अहो, खुद्द भास्करराव म्हणतात, 'योग आहे' म्हणून ! त्यांचं भविष्य कधी खोटं ठरतं काय ?

सुनीता : नेहमीच खरं ठरतं असं कुठंय ? आता मागच्या वर्षी केवढं जोरात भविष्य केलं होतं त्यांनी– भारतात मोठा अपघात होईल म्हणून. कुठे झाला अपघात... ?

दादा : झाला की...ग्वाल्हेरला.

सुनीता : म्हणजे ?

दादा : अहो, वाजपेयी पडले नाहीत का ?
(सगळे हसतात)

दादा : चला, निदान जावईबापूंचा पहिला दिवाळसण तरी लंडनला नक्कीच.

सुनीता : दादासाहेब, आता एवढ्यात येतील हं ते...हे आणायलाच गेलेत.

दादा : गेलेत हे...आणि येतील ते ? हा काय प्रकार आहे ?

सुनीता : तुम्ही चेष्टेत पटकन बोलाल हं ! आणि–

दादा : पटकन...छे छे... आपलं सगळं दमादमानं. काही झालं, तरी आपली मदार फिरकी गोलंदाजीवर...काय अतुल ?

(अतुल हसतो. बेल वाजते. बाहेर बराच आवाज.
प्रभाकर देशपांडे, मिस्टर– मिसेस बापट प्रवेश करतात. माणिक आतून बाहेर येते.)

दादा : वेलकम, वेलकम मिस्टर बापट ॲन्ड को– (बापट, 'आय ॲम नीळकंठ बापट' म्हणत शेकहॅन्डसाठी हात पुढे करतात. दादा अगोदर हात पुढे करून जवळ गेल्यावर 'नमस्कार' करतात.)

बापट : (बायकोच्या खांद्यावर हात टाकत) माय लीला !

दादा : अरे वा ! तुमची लीला का ? अगाध आहे !

बापट : आय मीन; मिसेस लीला नीळकंठ बापट.

(लीलाबाई नमस्ते करतात. दादा वात्रटपणे हात पुढे करून बराच वेळ शेकहॅन्ड करून– 'हॅलो ... हाऊ डू यू डू' करतात. बापट किंचित् चमकतात.)

बा
दा : वन मोअर !
: आणखी एक लीला आहे काय ? लीलावरच दिसताहेत.
: नो...नो वन मोअर.
: (इतरांना) एक मोर आणलाय म्हणताहेत.
(अलका. बॉबकट. प्रवेश करते)

पट : माय डॉटर–

अलका : नमस्ते. मी अलका बापट !

दादा : सूनबाई, पत्ता कट !

बापट : (गोंधळून) म्हणजे ?

दादा : म्हणजे बॉबकट !

बापट : वेल...आम्ही समजलो नाही !

सुनीता : (पटकन्) काही नाही– आमच्या दादासाहेबांच्या डोक्यात कधी काय येईल ते सांगता येत नाही.

प्रभाकर : हो–जरा थट्टेखोर स्वभाव आहे आमच्या दादांचा !

दादा : म्हणजे वात्यच म्हणा ना ?

बापट : (अपभ्रंश करीत) वात्या ?

दादा : इन इंग्लिश– अ नॉटी ओल्ड बॉय !

लीला : ओह – सो स्वीट !

दादा : (मोहरल्यासारखे करत)...हं हं...आतापर्यंत असं कुणी स्वीट वगैरे म्हटलं नव्हतं मला !

लीला : आय मीन– यू हॅव सच अ स्वीट सेन्स ऑफ ह्यूमर– नाही का हो ?

बापट : (विशिष्ट शैलीत जोर देत ' येस ' या अर्थी) यया !

दादा : (किंचित दचकून)– या !... आत या. (सगळे पुढे येतात) आमच्या देशपांडे खानदानाची ओळख करून देतो. मी दादा देशपांडे, निवृत्त प्राध्यापक– कंसात मराठी. (बापट ' हॅलो– हाउ डू यू डू ' करत उत्साहाने पुढे येतात) असू दे, मघाशी झालं की ! (बापट मागे जातात. लीलाताई ' हाय ' करतात, दादाही ' हाऽय ' करतात) हे नव्हतं झालं मघाशी ! बरं, या सुनीता देशपांडे, निवृत्त प्राध्यापकांच्या सूनबाई ! (बापट ' व्हेरी व्हेरी नाईस टू मीट यू ' करत पुन्हा शेकहॅन्डसाठी हात पुढे करून येतात. सुनीता गोंधळते.) नमस्कार करून टाका, शॉर्टकट मारा ! (सुनीता ' नमस्कार ' करते. बापट परत मागे. इकडे अतुल अलकाकडे नजर लावून गुंग. त्याला थोपटीत ) अहो, जरा वेळात वेळ काढून इकडे लक्ष दिलंत तर– (अतुल चटकन् वळतो ) हा अतुल देशपांडे– टेम्कोमध्ये इंजिनिअर आहे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 228450 नों. दि 22.1.81.5...
वि. नाटक क्र. ........

बापट : टेम्को ? यू मीन– टेल्को ?

दादा : नो– आय मीन टेम्को !

बापट : टेम्को ?

दादा : टेल्कोच्या कंपाऊंडच्या शेजारी– टेम्को. तिथं इंजिनिअर आहे. छत्र्या रिपेअर करतो... नाही– म्हणजे– काम नक्की माहिती नाही मला; पण पेढ चांगली आहे. आणि ही स्त्रीमुक्ती !

माणिक : दादा !

दादा : माणिक देशपांडे. राणेबाईंची शिष्या !

प्रभाकर : अतुल, जरा बॅगा आत नेऊ या.

अतुल : आं ! मी–

दादा : अरे बाबा, अशा सीनमध्ये; पडेल ती कामे करावीच लागतात. ( अतुल बाहेर जातो. जाताना स्टुलाला अडखळतो. ) बरं का बापट, आमचा अतुल म्हणजे कॉम्प्युटरमध्ये एकदम एक्स्पर्ट आहे.

लीला : ( स्टाईलीतच ) ओह ! सो नाईस !

दादा : ( त्याच शैलीत ) येस.– ही विल बी अ गुड चॉईस !

बापट : वेल– आम्ही समजलो नाहीच !

दादा : ( मागे वळून ) आता इंग्लिशमध्ये बोलूनही यांना समजत नाही,– हे काय तेलगू बापट आहेत का ?

सुनीता : ( पटकन् पुढे येत ) लीलाताई, या ना...आमचं घर दाखवते.

बापट : ओ येस...बी कंफर्टेबल, डार्लिंग–

लीला : ( आत जात ) लंडनमध्ये किनई; घरांचा पॅटर्न इतका वेगळा असतो – (दोघी किचनमध्ये जातात. अलका व माणिक एकमेकींशी बोलत पार्टिशन-मागील डायनिंग टेबलाशी बसतात. )

प्रभाकर : ( कोट काढीत ) बापट, मी जरा पडतो !

दादा : अरे, घरात पाहुणे आलेत आणि पडतोस काय ?

प्रभाकर : दादा, ड्रायव्हिंग करून खरंच दमलोय मी.

दादा : पडा, पडा– उगाच सुतकी चेहरे करून घरात हिंडू नका. (प्रभाकर जातो ) चला, निळूभाऊ !

बापट : निळूभाऊ ? हू इज निळूभाऊ ? आय ॲम नॉट निळूभाऊ– ( तेवढ्यात अतुल सूटकेस घेऊन येतो ) ओ ऽ– ही इज अतुलभाऊ !

दादा : तुम्हीच निळूभाऊ —

बापट : नो ! आय ॲम नीळकंठ हरेरामा बापट. ( ' बापट ' इतक्या जोरात म्हणतात, की अतुल सूटकेस खाली सोडतो. )

दादा : बरं, नीळकंठराव– चला, तुम्हाला आमचा बागबगिचा दाखवतो.

बापट : ओ! युअर गदान?

दादा : गदान? बागेला इंग्लीशमध्ये 'गदान' म्हणतात का? बरं, चला आमचं गदान दाखवतो. आमच्या गदानमध्ये आम्ही एक नवीन कलम केलंय.

बापट : कलम? ओह. यू मीन बोटॅनिकल क्रॉसिंग?

दादा : प्रत्येक शब्दाचं नका बुवा ट्रान्सलेशन करू इंग्लिशमध्ये. हिंदीत सांगायचं तर, मेरे भेजेको मुंगळे आते है. चलो. हमने हमारे बगीचेमें एक नया कलम कियेला है. टोमॅटेके झाडको ऊपर बटाटे आते है–चलो. (दोघे जातात. अतुल सुटकेस ठेऊन बाहेर येतो. उगाच आवराआवर.)

माणिक : हं...हं, आज अगदी आवराआवर चाललेली दिसतेय.

अलका : हाऽय!

(अतुल कसंबसं 'हाय' करून आत सटकतो. दोघी हसत पुढे येतात)

माणिक : किती वर्षं होतीस लंडनला?

अलका : दोन वर्षं!

माणिक : तिकडं म्हणजे सगळे टार गोरे असतील नाही?

अलका : हो ना. एकदम इतकी गोरी लोकं बघायची म्हणजे; जरा गांगरल्यासारखंच व्हायचं. (मुक्त हसतात)

माणिक : तुला चक्क सावळी म्हणत असतील की!

अलका : सावळी? अगं, काळी म्हण काळी!

माणिक : बाप रे, आता तुला काळी म्हटल्यावर, आमचा निकालच लागला. (हसतात) केलंस काय दोन वर्षं?

अलका : मी ना– खूप हिंडले, अगदी मनसोक्त!

माणिक : म्हणजे अगदी पाय दुखेपर्यंत?

अलका : अं हं, पप्पांचे पैसे संपेपर्यंत. (पुन्हा हसतात) नाही म्हणायला; एक कोर्स मात्र केला.

माणिक : मग नाही कशाला म्हणायचं?

अलका : बरं, मग हो म्हणते– ब्यूटिशियनचा कोर्स. काय गं, माणिक, पुण्यात ब्यूटी-पार्लर काढलं तर चालेल का गं?

माणिक : आता चालवणारी सुंदर आहे म्हटल्यावर; चालेलच तुझं पार्लर.

अलका : रिअली? (हसतात)

माणिक : तू लंडनला परत नाही जाणार?

अलका : बघू, जमलं तर!

माणिक : जमलं तर म्हणजे?

अलका : म्हणजे लग्न जमलं तर. (हसतात) अगं, सिरिअसली! मी पप्पांना म्हटलं,

मला पुण्यात राहायचंय. तर ते म्हणे–' एकटं राहायचं नाही, डॉटर. लग्नाचं जमलं तर, य्या! '

माणिक : म्हणजे, नवरा दाखव नाहीतर लंडनला चल!

अलका : हो ना, (हसतात) मला म्हणतात– ' पुण्यातला नवरा मिळव. ' नवरा म्हणजे काय फ्लॅट आहे का, एक महिन्यात मिळवायला?

माणिक : अगं, उलट नवरा मिळवणं सोपं आहे. नुसती जाहिरात दे, तुझ्याशी लग्न करायला मारामाऱ्या होतील मुलांच्या.

अलका : (हसत) मला मारामारी करणारा नवरा नको हं, माणिक, मला आपला शांत मुलगा आवडेल... परवा भांबुर्ड्याला एक मुलगा पाहिला... इतकी बकबक, माणिक, इतकी बकबक... बाकीचे सगळे नुसते सुन्न बसून ऐकत होते. (हसतात)

दादा : (प्रवेश करीत–) वा! अगदी इन्स्टंट गट्टी जमलेली दिसतेय दोघींची... बायकांचं असंच असतं. (बसतात)

अलका : असंच असतं, म्हणजे?

दादा : दोन बायका लग्नं व्हायच्या आधी भेटल्या, की हास्याच्या नुसत्या उकळ्या फुटतात.

अलका : आणि लग्न झाल्यावर भेटल्या तर?

दादा : नवऱ्याच्या उखाळ्या पाखाळ्या. (दोघी हसतात)

माणिक : दादा, अलकाचा एक प्रॉब्लेम आहे. तो तुम्ही सोडवलाच पाहिजे. नाहीतरी सध्या तुम्हाला काही उद्योग नाही.

दादा : काय प्रॉब्लेम आहे?

माणिक : अलकासाठी एक पॉश मुलगा एक महिन्याच्या आत शोधून द्यायचा.

दादा : बापरे! पॉश मुलगा महिन्याच्या आत? हे म्हणजे अगदी ' एसेस्सी हिंदी– दो दिनोंमें ' असला प्रकार झाला.

माणिक : ते काही असो. हा पुण्याच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे.

दादा : मग कॉर्पोरेशनमध्ये पाठवू.

माणिक : काही नको. तिथं कॉर्पोरेटर्स दंगा करतायत तेवढा पुरे. हे काय तुमचं, अहो, अलकासारखी मुलगी लंडन सोडून पुण्यात राहायचं म्हणतेय –आणि तिला साधा एक मुलगा मिळू नये?

दादा : मला वाटतं, एक तरी नक्कीच मिळाला पाहिजे.

अलका : (हसत) सध्या एकच पुरे.

दादा : अरे वा, अल्पसंतुष्ट वृत्ती आहे!

माणिक : आणि दादा, तुम्ही हे काम करू शकला नाहीत तर– (बजावते)

दादा : तर काय?

माणिक : येस ! (नाटकीपणे) तर इतिहास तुम्हाला कधीही क्षमा करणार नाही !

(हसतात)

दादा : माणके, अगं, अलकाच्या लग्नाचा काय प्रॉब्लेम- मुलगा आत्ता हजर केला असता,- पण केस जरा लांब हवे होते.

माणिक : उगाच सबबी सांगू नका.

दादा : बरं, चला. आम्ही मुलगा हजर करू... पण त्या आधी आम्हाला ' वधू-परीक्षा ' घ्यावी लागेल.

अलका : (हसत) माझी तयारी आहे.

दादा : (नाटकी आविर्भाव) ठीक् आहे. मुली, तुझं नाव काय ?

(माणिक अलकाला उगाच खोटं खोटं अवघडून खाली बसायला शिकवते- अलका नखं कुरतडत नाव सांगते. माणिक 'पॉश' म्हणून हसून दाद देते.)

दादा : अरे वा, राणेबाईंनी शिकवलं वाटतं. (खडूस गंभीर चेहरा) डोळे पाहू !

अलका : (गडबडून वर बघत... हसतच)... म्हणजे ?

दादा : मुलीला चष्मा नसावा.

अलका : (हसत-) नाही... चष्मा नाही.

दादा : मंगळ आहे ?

माणिक : हो आहे. का ?

दादा : नाही- मंगळ असला की, मुलं लग्नानंतर घरात टंगळमंगळ करतात अन बाहेर चंगळ करतात.

अलका : माय गॉड ! म्हणजे पुण्यात अजून एवढी कॉन्झर्वेटिव्ह मुलं आहेत ?

दादा : आता कॉम्प्युटरला नारळ फोडतात म्हणजे बघ ना !

माणिक : दादा, तुमच्या डोक्यात काय शिजतंय ?

दादा : शू ऽऽ ! ओ के- आपण सरळ मुद्द्याला हात घालू. अलका, तुला नवरा कसा हवा ?

अलका : (हसत ) बाप रे ! मोठा गंभीर प्रश्न आहे !

दादा : म्हणजे- नवरा गंभीर हवा ?

अलका : छे...छे ! थोडा व्रात्य असला तरी चालेल.

दादा : अरे वा ! म्हणजे मला स्कोप आहे.

माणिक : तिला नवरा हवाय, दादा, सासरा नाही.

(तिघंही हसतात)

दादा : बरं, सावळा चालेल की गोराच हवा ?

अलका : ' बावळट गोरा ' असेल, तर नको.

माणिक : बघा. म्हणजे- मला नाही वाटत हे जमेल ! आपलं म्हणजे बावळट गोरं !

दादा : माणके, तू जरा चूप बैस बघू. हं... आणखी हां... भरदार छातीचाचं हवा की किरकोळ चालेल ?

अलका : छातीचं जाऊ द्या,– पण दंड मजबूत हवेत !

दादा : का बुवा ? दंडाचं काय एवढं महत्त्वाचं काम काढलं ?

अलका : पाण्याच्या बादल्या उचलता याव्यात.

दादा : बापरे ! म्हणजे लंडनलाही पाणी भरणं आहेच का ?

माणिक : दादा, ती लंडनला कुठे राहणार आहे ?...पुण्यात पाणी नको भरायला !

दादा : बरं...डॉक्टर हवा की, इंजिनिअर चालेल ?

अलका : स्वतःच्या पायावर उभा असावा, एवढंच.

दादा : म्हणजे– कंडक्टर बेस्ट ! ( अलका दचकते )

माणिक : हॅं...कंडक्टर काय !

दादा : तो कायमच स्वतःच्या पायावर उभा असतो. टिंगडिंग, टिंगडिंग ! (दोघी हसतात) बरं– (एका कागदावर पेननं काही लिहीत) हे घ्या मेनूकार्ड.

अलका, माणिक : मेनूकार्ड ? (कागद घेतात)

दादा : स्थळांचं मेनूकार्ड. मुलांचे रेट्स बघा आणि ऑर्डर करा !

माणिक : ( मोठ्याने वाचते) डॉक्टर–

अलका : (वाचत) पन्नास हजार.

माणिक : इंजिनिअर–

अलका : चाळीस हजार.

माणिक : प्रोफेसर–

अलका : बारा हजार.

दादा : मराठीचा असेल तर, दोनहजार कमी ! आणि निवृत्त असेल तर स्वतः खर्चाची तयारी !

माणिक : दादा !... (पुन्हा वाचत) बॅंकेत क्लार्क-

अलका : वीस हजार.

माणिक : रेल्वेत टीसी – साठ हजार ! अय्या, टी. सी. चा रेट डॉक्टरपेक्षा जास्त !

अलका : असं का ?

दादा : सुटीच्या दिवसात रेल्वेनं प्रवास करा; म्हणजे कारण कळेल. गव्हर्नमेंटपेक्षा जास्त कमावतो तो. बरं, हे झाले साधे रेट्स. मुलगा 'फॉरेन रिटर्न्ड' असेल तर, टेन पर्सेंट एक्स्ट्रा.

माणिक : असं ? मग आमची मुलगी 'फॉरेन रिटर्न्ड' असेल तर ?

दादा : तर...वन पर्सेंट डिस्काऊंट ! ( दोघी हसतात.)

अलका : पण दादा, हा हुंडा झाला.

माणिक : हुंडा घेणं कायद्यानं गुन्हा आहे.

दादा : कायदा सोडा- तुमचा फायदा बघा!

अलका : हुंडा देण्यात कसला आमचा फायदा?

दादा : वेड्या मुलींनो, एकदा लग्नात हुंडा दिला; की नवरे जन्मभर गोंडा घोळत बसतात. (प्रेक्षकांकडं निर्देश करत) ते काय– समोर कितीतरी उदाहरणं बसलीच आहेत!–

माणिक : एक छदाम हुंडा मिळणार नाही. (घोषणेच्या आविर्भावात)
'आमची मुलगी गुणांचा हुंडा,
मिळणार नाही छदाम हुंडा!'

दादा : असं?– (तिच्याच आविर्भावात)
'आमचा मुलगा घोळेल गोंडा,
लग्नात पाहिजे हिरो होंडा...!' (सगळे हसतात) बरं, मुलगी गुणांचा हुंडा म्हणतेस–काय काय गुण उधळलेत मुलीनं; ते तर कळू दे.

माणिक }
अलका } : उधळलेत?

दादा : आपलं– काय काय गुण सामावलेत मुलीत, ते तरी कळू दे!

माणिक : सुशील आहे! सालस आहे!

दादा : (त्याच टोनमध्ये) सर्दीला आहे! खोकल्याला आहे!

माणिक }
अलका } : आं?

दादा : आल्याची वडी–आलेपाक!

अलका : ब्यूटिशियनचा कोर्स केलाय मी.

माणिक : तोही लंडनला– डोंबिवलीला नाही.

अलका : शिवाय, मला बाटिक पेंटिंग येतं.

दादा : अरे रे रे...

माणिक : काय झालं?

दादा : बाटिक पेंटिंग म्हणजे अगदी; खाटीक स्पिकिंग सारखं वाटतं...बरं, स्वयंपाक येतो?

अलका : हो...कुकर लावता येतो, मिक्सर वापरता येतो, शिवाय... दोन मिनिटांत नूडल्स करता येतात.

माणिक : बघा, दादा, किती किती स्वैपाक येतो!

दादा : शाब्बास! पुरणाची पोळी?

अलका : फिफ्टी पर्सेंट.

दादा : म्हणजे?

अलका : पोळ्या इतक्या छान जमतात.

दादा : घरचे तरी खातात का ?

अलका : पोळी इतकी छान करता येते! पण पुरण नवऱ्यानं वाटून द्यायचं!

दादा : वा! को-ऑपरेटिव्ह सोसायटी! गुड...आता शेवटचा प्रश्न– मुलीला गाता येतं ?

अलका, माणिक : गाता ?

दादा : होय, गाता...मुलीला गाता येतं काय ?

माणिक : ऑफ कोर्स...प्रत्येक स्त्रीला गाता हे येतंच!

दादा : 'माझा कोंबडा कोणी मारियेला-' हे भावगीत म्हणा पाहू!

(दोघी दचकून पळतात.)

दादा : बरं...मग 'आजा आयी बहार' हे गाणं चालीवर म्हणून दाखवा पाहू.

माणिक, अलका : (मोठ्यानं गात) आजा– आयी बहार, दिल है बेकरार
ओ मेरे राजकुमार– तेरे बिन रहा न जाय
आजा ऽ '...

(प्रभाकर व बापट येतात)

दादा : अर्रर्र...एन्ट्री चुकली तुमची.

(दोघं 'अं...म्हणजे ?' करत विंगेत सरकतात)

दादा : मला वाटलं, अतुलची एन्ट्री पडेल. बरं...या आता आलाच आहात तर. बसा. या.

प्रभाकर : मी पडतो जरा!

दादा : तुझं पडणं बरस झालं. आता बस जरा... मला पडू देत मधल्या खोलीत... चल... बसा इथं तुम्ही. आम्ही आत जातो. राजकुमारच्या शोधात!

(दादा आणि मुली तेच गाणं म्हणत आत जातात– बापट व प्रभाकर बसतात. लीलाताई येतात.)

लीला : (पदरानं गळा पुसत) हुश्श्यऽऽ... काय उकडतंय इथं... लंडनमध्ये किनई अगदी कूल वाटतं...नाही का हो ?

बापट : (ओठांचा चंबू व गाल हलवीत, yes या अर्थी) 'या!'

दादा : (आतून) आलोच. तुम्ही बसा.

लीला : आणि किती वेगळं वाटतं लंडनला, नाही का हो!

बापट : 'या'– (नाटकी स्टाईल) दे हॅव अ टोटली डिफरंट सिस्टिम यू नो... टोटली डिफरंट.

प्रभाकर : अरे, पण...डिफरंट डिफरंट म्हणजे नेमकं काय डिफरंट आहे ?

बापट : तिथलं एकूण कल्चर यू नो.

लीला : हो ना...किती वेगळं कल्चर आहे.

प्रभाकर : मला काही कळलं नाही बुवा.

बापट : वेल...कल्चर म्हणजे—एक किस्सा सांगतो तुला. ॲझ ॲन एक्झाम्पल—मी सहज असा रस्त्यावरून चाललो होतो.

प्रभाकर : चला... म्हणजे लंडनलाही रस्त्यावर चालतात तर!

बापट : ऑफकोर्स.

लीला : पण लंडनचे रस्ते म्हणजे कित्ती क्लीन आणि स्वच्छ असतात; नाही का हो?

बापट : या... तर यू सी...एका ' शॉप 'मधनं कुणीतरी मला ' शुकशुक ' केलं.

प्रभाकर : आं...लंडनमध्ये ' शुकशुक ' केलं?

बापट : वेल- (हसत) तो ' एक्स्क्यूज मी ' म्हणाला.

प्रभाकर : असं होय- मला वाटलं—

बापट : मी आत गेलो. त्यानं कशासाठी बोलावलं होतं माहितीय?

प्रभाकर : कशासाठी?

बापट : एक मोठं कपाट त्याला रस्त्यावरून आत न्यायचं होतं.

प्रभाकर : न्यायला, तुला काय हमाल समजला तो?

लीला : अय्या- तुम्ही सूट घातला नव्हता का?

बापट : वेल...मी फुलसूटमध्ये होतो...पण तिकडं अशी कामं करायला लाजत नाहीत. डिग्निटी ऑफ लेबर यू नो.

प्रभाकर : गंमत आहे.

बापट : खरी गंमत तर पुढेच आहे.

प्रभाकर : असं होय- मला वाटलं, झाली गंमत.

बापट : मी निघालो- तर त्यानं पटकन पाच रुपये हातात ठेवले माझ्या.

प्रभाकर : बाप रे! हमाली?

लीला : अय्या- तुम्ही घेतले ते?

बापट : ऑफकोर्स- नसते घेतले तर चिडला असता तो. इन लंडन यू नो- कुणीही काम फुकट करून घेत नाही. तुला आश्चर्य वाटेल, प्रभाकर- लंडनला ' प्यूनस् 'मध्ये मेजॉरिटी आपली इंडियन लोकं आहेत.

प्रभाकर : वा...काय अभिमानाची गोष्ट आहे!

बापट : सेकंड थिंग इज...क्लीनलीनेस...स्वच्छता. अरे, परवा डेक्कनला सहज गेलो होतो...अवर गुड ओल्ड डेक्कन, यू नो...तिथं तल्लफ आली चहाची. म्हणून तुमच्या त्या अमृततुल्यमध्ये गेलो...माय गॉड, इट वॉज हॉरीबल! ओम बासवेश्वर अमृटतुल्या!

प्रभाकर : का रे- काय झालं...चहात माशी सापडली?

बापट : वेल, माशी- यू कॅन अन्डरस्टॅन्ड...पण त्या पोरानं पाणी आणलं...माय गुडनेस- पाची बोटं पाण्यात बुचकळलेली.

लीला : ईऽऽ...किती ऑड...

प्रभाकर : अरे, बरोबर– परवा मीही त्याच हॉटेलमध्ये गेलो होतो...मलाही त्या पोरानं तसंच बोटं बुचकळून पाणी आणून दिलं. असा झापला मी त्याला– तर तो काय म्हणाला माहितीय– ' साहेब, मी तर फक्त पाण्यात बोटं बुचकळली– पण मला पाणी देतंय ते पोरगं बॅरलमध्येच उभं राहून पाणी देतंय. '

बापट : ओ हो हो...सो इनहायजिनिक.

प्रभाकर : वर म्हणतो कसा– ' साहेब, आठ आण्यात चहा हवा असला, तर असाच मिळणार ! '

लीला : काय उर्मट बोलणं हे– ही काय भाषा झाली ?

प्रभाकर : (उठत) अहो, ही तर खरी मराठी भाषा !

बापट : अरे– तू कुठं चाललास, प्रभाकर ?

प्रभाकर : मी जरा पडतो ! (आत जातो.)

लीला : अहो, ऐकताय का ?

बापट : ऐकतोय की —

लीला : (हळू आवाजात) शुक् शुक्. इकडे या की जरा !

बापट : छे...छे...आत्ता काय ? भलतंच काहीतरी.

लीला : (बापटांचा दंड धरून कोपऱ्यात नेत) भांबुर्ड्याला नकार कळवून टाका !

बापट : पण पार्टी चांगली होती. (मागे हळूच दादा येतात.)

लीला : मग आपली पोर्टी काय वाईट होती ?

बापट : तसं नाही–

लीला : मग कसं ?

बापट : काही नाही— तुम्ही म्हणाल तसं !

लीला : मी म्हणते– इथं शब्द टाकायला काय हरकत आहे ?

बापट : (दचकून) इथं ?

लीला : हळू बोला– अतुलबद्दल म्हणतेय मी !

बापट : अतुल ? अतुल कशाला ?

लीला : अँ हँ हँ– (वेडावत) म्हणे अतुल कशाला ?

बापट : ओ हो हो, यू मीन अवर डॉटर...बट यू नो...

लीला : आय नोच ! म्हणूनच म्हणतेय मी– शिकलेला आहे– टेम्कोत इंजिनिअर आहे—

बापट : पण त्यांचा विचार आहे का ?

लीला : नसायला काय झालं ?

बापट : वेल– मी प्रभाकरशी बोलतो.

लीला : काही नको.

बापट : वेल, देन– तुम्ही वहिनींशी बोला.
लीला : कशाला ते ?
बापट : (वैतागून) अहो, मग करायचं काय ?
लीला : अहो, आपण अतुललाच गटवू या !
बापट : वेल, यू मीन पटवू या ?
लीला : नो– आय मीन गटवूच या !
बापट : पण कसं ? तुम्ही मागे आम्हाला गटवलंत तसं ?

(दोघे हसत असतानाच काळोख. 'ना ना करके प्यार तुम्हीसे कर बैठे' अशा प्रकारचं एखादं गाणं ! )

## अंक पहिला : प्रवेश दुसरा

(अलका मासिक चाळत बसलीय. बेल वाजते. अलका दार उघडते. अतुल ऑफिसवरून आलेला ).

अलका : हॅलो–
अतुल : हॅलो– कुणी नाही का घरात ?
अलका : मी आहे की. (हसते)
अतुल : नाही...म्हणजे बाकीचे सगळे–
अलका : समोर गेलेयत...लेल्यांच्याकडं.
अतुल : लेल्यांच्याकडं... ? समोर तर नेने राहतात.
अलका : हो हो– नेन्यांच्याकडं...तुम्हाला चहा ठेऊ का ?
अतुल : चहा...नाही, नाही– चहा नको.
अलका : (हसत) मला जमतो चहा...पिऊन तर बघा.
अतुल : तसं नाही– मी दूध घेतो हल्ली. ( थोडा अवघडून उभा)
अलका : बसा ना...घर आपलंच आहे !
अतुल : अं ? (अवघडत हसतो. बसतो)
अलका : नेहमी घेता ?
अतुल : अं...नेहमी नाही...अधूनमधून.
अलका : असं होय. मला वाटलं रोज घेता.
अतुल : छे–छे. रोज कोण घेतंय–तुम्ही दूध म्हणताय का ?
अलका : हो. तुम्हाला काय वाटलं ?
अतुल : मला वाटलं ड्रिंक्सबद्दल विचारताय. दूध मी रोज घेतो.
अलका : अच्छा– आणि ड्रिंक्स कुठली घेता ?

अतुल : बिअर घेतो फक्त.

अलका : नो सिग्रेट ?

अतुल : नाही. सिग्रेट नाही ओढत मी. (थोड्या वेळानं उगाचच) एका सिग्रेटमुळे माणसाचं आयुष्य सात मिनिटांनी कमी होतं म्हणे.

अलका : हो का ?

अतुल : हो. असं वाचलं होतं मी. सात का पाच ते नक्की आठवत नाही.

अलका : मात्रा घेता की नाही ?

अतुल : (दचकून) तुम्हाला कसं कळलं ?

अलका : (हसत) सहज– अंदाज केला.

(थोडा वेळ शांतता)

अतुल : हे केव्हा गेलेत ?

अलका : हे कोण ?

अतुल : हे– घरचे सगळे.

अलका : तसा बराच वेळ झाला. काही हवं होतं का ? (जवळ जाते)

अतुल : नाही. सहज विचारलं. (थोडा भांबावतो.)

अलका : आज जरा उकडतंय नाही !

अतुल : पंखा लावू का ?

अलका : (वर बघत) इथं आहे कुठं पंखा ?

अतुल : (वर बघत–ओशाळत) हो– परवाच काढला नाही का ? काल मात्र जरा जास्तच उकडत होतं.

अलका : मी तुम्हाला बोअर करतेय का ?

अतुल : तसं नाही– मला अशी सवय नाही.

अलका : अशी म्हणजे ?

अतुल : असं...मुलीशी एकांतात... (शब्द चुकला असं वाटून) एकांतात म्हणजे मला म्हणायचंय...

अलका : आलं माझ्या ध्यानात. इट्स ओके.

(शांतता.)

अतुल : (थोडं मोकळं होण्याचा प्रयत्न करीत) छान वाटतं नाही ?

अलका : असं एकांतात ना ? (पुन्हा जवळ जाते)

अतुल : नाही– म्हणजे...हे... घर शांत असलं की कसं बरं वाटतं.

अलका : (आठवून उठत) अरे हो–मला वाटतं, तुमच्यासाठी भडंग करून ठेवलंय –थांबा हं, आणते.

(अलका मागे जाऊन बशीत भडंग आणते. अतुल जरा भांग नीट करतो.)

अतुल : (बशी घेत) थँक्स. लंडनला मिळतं का हो ?

अलका : काय ?
अतुल : भडंग.
अलका : ( हसत ) छे...लंडनला कुठलं आलंय भडंग !
अतुल : (भडंग खात ) तुम्हाला आवडतं का ?
अलका : काय- भडंग ?
अतुल : नाही- लंडन ?
अलका : विशेष नाही. पण भडंग मात्र खूप आवडतं.
अतुल : (पटकन बशी पुढे करत) मग घ्या ना. ( पुन्हा बशी मागे घेतो )
अलका : छे ! टेम्कोच्या ऑफिसरकडून भडंग काय घ्यायचं ?
अतुल : (खुषीत) मग काय घेणार ?
अलका : बिअर.
अतुल : अं ? ( भडंग किंचित सांडते )
अलका : तुम्हाला धक्का बसला का ऐकून ?- भडंग सांडलं म्हणून विचारते.
अतुल : नाहीनाही. इट्स ओके.
अलका : तुम्हाला आवडत नाही का ?
अतुल : आवडते ना.
अलका : काय ?
अतुल : बिअर.
अलका : तसं नाही-मुलींनी घेतलेली आवडत नाही का ?
अतुल : अं-तसं नाही.
अलका : पार्टी वगैरे असली तर, मी रम पण घेते.
(यावेळी बरंच भडंग सांडतं. )
अतुल : ( विषय बदलून ) हे सगळे नेन्यांकडं कशाला गेलेत हो ?
अलका : मला वाटतं, टीव्ही बघायला.
अतुल : तुम्ही नाही गेलात ?
अलका : मला नाही विशेष आवडत- टीव्ही बघणं.
अतुल : ( उत्साहानं ) मलाही नाही आवडत टीव्ही बघायला !
अलका : चला- आपली एक तरी आवड जमतेय म्हणायची.
अतुल : ॲक्च्युअली- दुसरी म्हटली पाहिजे.
अलका : अं...दुसरी कुठली ?
अतुल : भडंग.
( दादा मागे येऊन उगाच खोकतात.)
अतुल : बेल वाजली का ?
अलका : मला नाही वाटत...बघू का ?

अतुल : नाही– मला वाटतं, मला भास झाला!... तुम्ही लंडनला सेटल होणार असाल, नाही?

अलका : छे...छे! मला पुण्यात राहायचंय. तुम्ही मदत केलीत तर आत्तासुद्धा राहीन.

अतुल : म्हणजे...मला नाही समजलं.

अलका : अगदी स्पष्ट सांगायचं म्हणजे; सध्या माझ्यासाठी वरसंशोधन मोहीम चालू आहे.

अतुल : (किंचित लाजत) अं...अच्छा! पण मी–

अलका : तेव्हा, तुम्ही मनावर घेतलंत तर प्रश्न सुटेल.

अतुल : (गोरामोरा होत) मी...पण माझं ..आय मीन तुम्ही–

अलका : बोला– करताय का?

अतुल : (ताडकन उठत) अं...म्हणजे– (पाण्याचा ग्लास सांडतो.)

अलका : खरंच सांगा– करताय का...मदत?

अतुल : मदत...मदत म्हणजे...

अलका : आमच्या मोहिमेत मदत हो...तुमचे इतके मित्र असतील पुण्यात...कुणाचं प्रपोझल असलं तर बोला.

अतुल : (बसत) तसं म्हणताय होय...

अलका : अर्थात– बघा हं...तुम्हालाच जर मी बरी वाटले, तर–

अतुल : अं...तर...तर काय– (पुन्हा लाजतो.)

अलका : नाही– तरच शब्द टाका माझ्यासाठी! हो, उगाच तुमच्या मित्रांनी म्हणायला नको– काय प्रपोझल आणलंय अतुलनं म्हणून!

अतुल : छे...छे...तुमच्या बाबतीत काही प्रश्न आहे का?

अलका : म्हणजे?

अतुल : म्हणजे– तुम्हाला कोण नकार देणार?

अलका : खरं म्हणताय? मग प्लीज– तुम्हीच करून टाका ना!

अतुल : (गांगरून) मी? अहो, पण माझं–

अलका : खरंच...मनापासून म्हणतेय मी– एवढं काम तुम्ही करूनच टाका.

अतुल : काय... होय... पण–

अलका : पण काय हो; मला बॉबकट कसा दिसतो?

अतुल : सुंदर...आय मीन, चांगला दिसतो.

अलका : तुम्ही हुंडा घ्याल का हो?

अतुल : आं– पण मी—

अलका : नाही– म्हणजे मुलीकडं हुंडा मागतात का हल्ली?

अतुल : छे छे! असं डायरेक्ट हुंडा कोण मागतंय?

अलका : मग टरलं तर—

अतुल : ( गोंधळून ) ठरलं तर म्हणजे–

(बेल वाजते. दार उघडंच असल्यानं लीलाताई आत येतात.)

अलका : मम्मी, शेवटी आमचं लग्नाचं ठरलं, बरं का !

लीला : ( आश्चर्यानं ) अगं, काय सांगतेस काय ?

अलका : तेच तर सांगतेय– आता माझ्या लग्नाचा प्रॉब्लेम संपला.

लीला : खरं सांगतेस ?

अलका : अगदी खरं– माझं आणि अतुलचं आत्ताच ठरलं !

लीला : माय गॉड– अगं, काँग्रॅट्स अलके...( खूष होऊन बाहेर जात.) थांब, मी यांना गुडन्यूज देऊन येते. अगं, पुढच्या आठवड्यात दिवस खूप चांगला आहे– म्हणत होते नेने.

अलका : ए मम्मी– एक्साईट होऊ नकोस. अगं, माझं आणि अतुलचं काय ठरलंय ते तरी ऐक.

लीला : काय ठरलंय ?

अलका : अतुलनं माझ्या लग्नासाठी प्रयत्न करायचा, असं ठरलं.

लीला : अं– असं होय– मला वाटलं–(अतुलकडे सूचक पाहते. अतुल बावचळतो. उठून निघतो. )

अतुल : मी जरा जाऊन येतो.

अलका : ( हसत ) मावा खायला का ?

अतुल : नाही .. अं, हो... आलोच. (जातो.)

लीला : अगं, हा मावा काय प्रकार आहे ?

अलका : मावा ना...हा तंबाखूचा एक प्रकार आहे.

लीला : ईऽऽ, अतुल तंबाखू खातो ?

अलका : मग काय झालं ?– पप्पाही खातात मावा.

लीला : ( अंग शहारून ) काय सांगतेस– पण लंडनला मावा मिळतो ?

अलका : ( आठवून ) मम्मी, लंडनला भडंग मिळतं का गं ?

लीला : भडंग ? हे भडंग कुठून आलं मध्येच ?

अलका : भडंग आम्हाला दोघांनाही खूप आवडतं.

लीला : च्–दोघांना म्हणजे ?

अलका : म्हणजे– मला आणि अतुलला. आता हा अतुल कुठून आला मध्येच– असं विचारू नकोस. (लीलाताई गप्प ) हो– आणि आम्हाला दोघांनाही टीव्ही बघण्यात इंटरेस्ट नाही.

लीला : तुझ्या डोक्यात काय शिजतंय ?

अलका : तुझ्या डोक्यात शिजतंय तेच. कमॉन, मम्मी, आय नो इट. आम्ही

एकांतात भेटावं, हा तुझाच प्लॅन होता की नाही ?

लीला : अतुल मला चांगला मुलगा वाटतो.

अलका : जरा बावळट आहे !

लीला : कायतरीच काय ?

अलका : फार म्हणत नाही मी, पण थोडा बधिर आहेच.

लीला : भाबडा आहे गं बिचारा !

अलका : मी कुठं म्हणतेय; बोबडा आहे म्हणून ?

लीला : अगं, हुषार आहे.

अलका : मावा सोडला, तर निर्व्यसनी आहे. पण मम्मी, मीच त्याला पसंत नसले तर ?

लीला : वेडी आहेस का ? अगं, बघितलं नाहीस– कसा गोरामोरा झाला होता ते ?

अलका : म्हणजे काय ?

लीला : अगं, पुरुष गोरामोरा व्हायला लागला की समजायचं– बुरूज ढासळला !

(दादा, माणिक येतात)

दादा : कसला बुरूज ढासळला, लीलाताई ?

अलका : तुम्ही आमचं बोलणं ऐकलं की काय, दादा !

दादा : सगळं नाही– बाहेर नीट ऐकू येत नव्हतं.

माणिक : वा, दादा ! आधी चोरून ऐकायचं आणि नंतर म्हणायचं– नीट ऐकू नाही आलं...

लीला : ओह ! मी विसरलेच. अलका, अगं, त्या नेन्यांनी बोलावलंय तुला.

अलका : मला ?...कशाला ?

लीला : अगं, चल तर खरी...मी विसरूनच गेले. आम्ही येतो हं, दादा. (दोघी जातात.)

माणिक : हे जमेल असं वाटतं तुम्हाला ?

दादा : माणके, अगं, आयुष्य म्हणजे 'जमवाजमव' सोडून दुसरं काय आहे !

माणिक : पत्रिका जमली पाहिजे ना !

दादा : जमणारी पत्रिका करून देऊ– आहे काय !

माणिक : पण अतुल तिला बावळट वाटतो, त्याचं काय ?

दादा : हॅत्तिच्या !–त्याला स्मार्ट करून टाकू. एकदम डॅशिंग.

माणिक : अशक्य आहे.

दादा : का ?

माणिक : फक्त अठरा दिवस आहेत. अठरा दिवसात काय डॅशिंग होणार तो ?

दादा : होणार !

माणिक : काय जादू करणार आहात ?
दादा : जादूच ! हिप्नॉटिझम...ढॅण् टॅ ढॅण्...
माणिक : तुम्हाला येतं हिप्नॉटिझम ?
दादा : अरे ! शंका आहे की काय ! थांब तुलाच हिप्नोटाईझ करतो... इकडं ये चल. हं, बैस अशी. कमॉन. रिलॅक्स... रिलॅक्स... डोळे मिटू नको. माझ्याकडं बघ.
माणिक : तुमच्याकडं बघण्यासारखं काय आहे !
दादा : चेष्टा करू नकोस. समोर बघ– ( हाताने काहीतरी 'छू मंतर' करतात ) सारं कसं शांत शांत वाटतंय की नाही !
माणिक : ( गुंगीत ) हो– सारं कसं शांत शांत वाटतंय मला !
दादा : समोर काय दिसतंय तुला ?
माणिक : अंधार...अंधार दिसतोय मला !
दादा : नीट पहा...निरभ्र आकाश दिसतंय !
माणिक : निरभ्र आकाश...सूर्य आणि तारे !
दादा : सूर्य आणि तारे ? हिला डोस जास्त झाला का काय !...बरं, लांबून काही आवाज ऐकू येतायत ?
माणिक : म्यांऊ...म्यांऊ.
दादा : आणखी ?
माणिक : (कोंबड्याचा आवाज करते )
दादा : हा आवाज कुणाचा ?
माणिक : दादांचा !
दादा : दादा देशपांडे म्हणजे लाखात एक माणूस.
माणिक : दादा देशपांडे म्हणजे लाखात एकदम खडूस.
दादा : आणि– तुझा बाप ?
माणिक : तो माझा बाप नाही.
दादा : (चमकून) आं...बाप नाही ?
माणिक : ते माझे पूज्य पिताजी आहेत. मातृदेवो भव.
दादा : आं...तुला पितृदेवो म्हणायचंय का ?
माणिक : मातृपण देवोच भव.
दादा : अतुल...अतुल हा एक तरुण आणि तडफदार मुलगा आहे.
माणिक : अतुल हा एक बधिर मुलगा आहे.
दादा : असं ? आणि राणेबाई ? तुझी राणेबाई ही एक वाया गेलेली बाई आहे !
माणिक : (उठत) राणेबाई देशाचं आशास्थान आहेत. आपण त्यांचे हात बळकट करायला पाहिजेत.

दादा : (कपाळावर हात मारीत) माणके– चावटपणा करू नकोस.
(माणिक हसते.)

दादा : माणके, हिप्नोटाईझ होण्यासाठी पूर्ण कोऑपरेशन द्यावं लागतं. तुझ्या-सारख्या आगाऊ मुलीला कसं हिप्नोटाईझ करणार!

माणिक : पण दादा– अतुलवर जमेल हा प्रयोग!

दादा : कशावरून?

माणिक : दुबळ्या मनाच्या माणसांवर जमतं म्हणतात ना?

(अतुलचा प्रवेश)

दादा : या...हीरो...कुठे गायब झाला होता?

अतुल : काही नाही...जरा फिरून आलो.

माणिक : मावा खाऊन आलो; सांग की.

अतुल : तू चप ए.

दादा : शाब्बास...जरा झापत जा तिला. फार बकबक करते हल्ली.

माणिक : (हसत) ॲहं– लहान बहिणीला झापलं म्हणजे काही 'डॅशिंग' म्हणत नाही कुणी.

(अतुल छाती फुगवत माणिकजवळ जातो. माणिक हात लावून 'फूस्सऽऽ' करते. हवा गेलेल्या फुग्यासारखा अतुल खाली पडतो.)

दादा : (प्रेक्षकांना) मंडळी, हे आपल्या देशातल्या युवाशक्तीचं गाठोडं!
(माणिकला) माणके...तू जरा आत जा बघू.

माणिक : काय करू आत जाऊन?

दादा : अगं, पड जरा...तुझा बाप नाही पडत?
(उठते. 'बरं, जाते मी...बेस्ट ऑफ लक' म्हणत आत जाते.)

दादा : अतुल...जरा असा बैस पाहू– झक्कपैकी. मला तुझ्याशी जरा बोलायचंय.

अतुल : (गंभीरपणे बसत) कशाबद्दल, दादा?

दादा : अरे...मला एक सांग, तुला काय प्रॉब्लेम आहे?

अतुल : म्हणजे?

दादा : अरे...हे भविष्य... पत्रिका... हे सगळं काय चाललंय? एवढा विश्वास आहे तुझा?...हल्ली सारसबागेत गणपतीलाही जातोस म्हणे.

अतुल : विश्वास असं नाही...पण थोडी मदत होते, असं वाटतं.

दादा : कसली मदत?

अतुल : निर्णय घ्यायला– निदान काही महत्त्वाचे तरी.

दादा : निर्णय घ्यायला विश्वास पुरत नाही, अतुल, आत्मविश्वास लागतो.

अतुल : ते खरंय दादा– पण हल्ली माझा कॉन्फिडन्स कमी झालाय. कारण– मलाही

माहिती नाही.

दादा : मी कारण शोधलं तर ?

अतुल : कसं शोधणार ?

दादा : हिप्नॉटिझममुळं मनातलं सगळं शोधता येतं. (अतुल हसतो) मी सिरिअसली म्हणतोय– तू मनापासून सहकार्य केलंस, तर मी मदत करून शकेन.

अतुल : तुम्ही हिप्नॉटाईझ करू शकता ?

दादा : तू कोऑपरेशन दिलंस तर, नक्की !

अतुल : चालेल...मी ट्राय करतो.

दादा : (अतुलला नीट बसवून–कपाळावर हात दाबत–) गुड...आता सगळं विसरून जायचं...बघ...कसं शांत वाटतंय की नाही...तुला झोप येतेय आता...अगदी शांत...शांत (अतुल सिन्सिअरली गुंगीत जातो.)...सांग पाहू; कसं वाटतंय आता...(अतुल डोळे मिटून गुंगीतच गप्प)...काय दिसतंय तुला ?(अतुल गप्पच)...अतुल...अरे, ऐकतोयस का तू...काय ऐकतोयस– सांग बरं. (मोठ्यानं) याची वाचा गेली काय ! अरे, मी काय बोलतोय; ऐकू येतंय का तुला ?

अतुल : (एकदम ताडकन उठून, मोठ्यानं) ये क्या हो रहा है ?

(दादा 'आं...?' करीत पाहत असतानाच, पहिल्या अंकाचा पडदा.)

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

(पहिला अंक जेथे संपतो– तेथेच दुसरा सुरू होतो. दादा अतुलकडे आश्चर्याने पाहात उभे-)

दादा : अरेच्या– हा हिंदीत का बोलायला लागला– अतुल– जरा शांत बैस पाहू–

अतुल : (तंद्रीतच) दादा... ये मुझे क्या हो रहा है ?

दादा : काही होत नाहीय, अतुल...तुला समोर काय दिसतंय, सांग पाहू ?

अतुल : मला...मला तलाव दिसतोय.

दादा : तलाव...कसला तलाव ?

अतुल : नैनितालचा... सुंदर तलाव.

दादा : शाब्बास ! तू नैनितालला काय करतोयस ?

अतुल : मी टूरवर आलो आहे.

दादा : अस्सं ?...बरं, अजून काय दिसतंय ?

अतुल : लाल लाल सफरचंद,... आणि...आणि—

दादा : बोल बोल...हिप्नोटाईझ झाल्यावर लाजायचं नसतं.

अतुल : –आणि– सफरचंदासारखे गाल असलेल्या सुंदर तरुणी दिसतायत.

दादा : क्या बात है ! त्यांतली सर्वांत सुंदर तरुणी कोण आहे ?

अतुल : तिने बॉबकट केलाय, ती.

दादा : अरे वा...बरं, ती तरुणी काय करतेय ?

अतुल : भडंग खातेय.

दादा : भडंग ? छान...तू काय खातोयस ?

अतुल : मी दूध पितोय.

दादा : आनंद आहे.

अतुल : आं ?

दादा : काही नाही– तुझं दूध पिणं चालू दे.

अतुल : मला...मला—

दादा : हं बोला...बोला.

अतुल : मला तिचे हात हातांत घ्यावेसे वाटतात.

दादा : मग थांबलायस का?

अतुल : तिला मी आवडत नाही.

दादा : कशावरून?

अतुल : कारण मी मॅनली नाही.

दादा : तू मॅनली का नाहीस?

अतुल : कारण माझ्या छातीवर केस नाहीत.

दादा : तुझ्या छातीवर केस का नाहीत?

अतुल : कारण माझी रास कन्या आहे!

दादा : बरं; मग?

अतुल : आणि– कन्या म्हणजे साडेसाती.

दादा : सारसबागेतल्या गणपतीवर श्रद्धा आहे ना तुझी?

अतुल : हो.

दादा : मग गणपतीला म्हणावं, माझ्या छातीवर केस हवेत बुवा!

अतुल : असं गणपतीला कसं म्हणायचं बुवा?

दादा : तसा तू चांगला मुलगा आहेस.

अतुल : पण असं तुम्ही म्हणून काय उपयोग!

दादा : असं ती म्हणाली.

अतुल : ती...ती कोण?

दादा : तीच ती– नैनितालला वचावचा भडंग खातेय ती.

अतुल : खरंच– अलका असं म्हणाली?

दादा : तू चारचौघात उठून दिसतोस, म्हणाली.

अतुल : (उठून) असं म्हणाली ती?

दादा : तू बस. (त्याला बसवतात.) तू हुषार आहेस म्हणाली.

अतुल : म्हणजे मला चान्सेस आहेत–

दादा : डॅशिंग झालास, तर आहेत!

अतुल : मग मी होईन– डॅशिंग.

दादा : मग बांध गुडघ्याला बाशिंग!

अतुल : मी होईन मॅनली!

दादा : कसा होशील दाखव बघू (अतुल तोंडात बोटं घालून शिट्टी वाजवतो.) मॅनली म्हणजे मवाली नाही.

अतुल : नाही. मॅनली म्हणजे मवाली नाही.

दादा : पत्रिकेचं काय ?

अतुल : पत्रिका गेली उडत.

दादा : पत्रिका हवी– का अलका ?

अतुल : अलका...अलका...अलका.

दादा : मी बघतो आली का ?

( अतुल एकदम ‘ शम्मी कपूर स्टाईल ’ उठून ‘ या ऽ हू ’ करतो. )

दादा : (दचकून बघत ) ए...अरे, काय झालं ?

अतुल : (आणखी एक जोरदार ‘ या ऽ हू ’– नाचत गाणंच म्हणतो. )

‘ चाहे कोई मुझे जंगली कहे—
अलका बापट तशी चांगली आहे ’

दादा : क्या बात है !

अतुल : मी प्रेमदिवाणा झालो आहे– मी ऽ काय करू !

या ऽ हू – या ऽ हू !
मेरे सीनेपे ना बाल है
पर अंदर तो दिल है
मुझे बध्थड तो न समझो
मैं हूँ डॅशिंग एक नौजवाँ
आज मला हवी, ती बॉबकटवालीऽऽ
चाहे कोई मुझे जंगली कहे
अलका बापट तशी चांगली आहे
या ऽ हू– या ऽ हू,...

(अलकाचा प्रवेश. अतुलचं ‘ याऽहू ’ चालूच )

अलका : ( बिथरून ) दादा – हे काय म्हणताहेत ?

अतुल : या ऽ हू—

दादा : काही नाही– तो ‘ या हो ’ म्हणतोय...या...या.

अतुल : ( दादांना ) जा ऽ हू—

दादा : आं– हे जाहू काय ?

अतुल : मी तुम्हाला ‘ जा हो ’ म्हणतोय.

( दादा हसत आत जातात. )

अतुल : (स्टाईलमध्ये) हाय !

अलका : (बावचळून) काय ?

अतुल : आय सेड, हाय– कमॉन–लेट अस डान्स–

अलका : ( गोंधळून उभीच ) नाही... ठीक आहे.

अतुल : अगं ये-

अलका : आं ?

अतुल : ये, जवळ ये लाजू नको ! अगं ये, जवळ ये लाजू नको.

अलका : पण मी... मला...

अतुल : (हसत) रिलॅक्स बेबी . बस, जवळ यायचं बघू नंतर-तूर्त लाजू तरी नको.

अलका : ( हसत ) पण तुम्हाला हे काय झालं... तुम्ही दूध जास्त घेतलं का ?

अतुल : अरे हट्- ही काय दूध घ्यायची वेळ आहे ?

अलका : मग... काय करायची वेळ आहे ?

अतुल : लेट अस हॅव बिअर.

अलका : काय... बिअर ?

अतुल : ओ येस, माय डिअर.

अलका : (ताडकन् उठते, तोल जातो)- डिअर ?

अतुल : (हसत) ऑफकोर्स- मला आवडतेस तू.

अलका : अहो, असं काय करताय ?

अतुल : ओहो हो अलका- मेरी अलका-

अलका : मी बघते मम्मी आली का.

अतुल : अलका... तू आहेस- तू आहेस-

अलका : मी आहे ?

अतुल : तू आहेस- माझ्या काळजात पडलेली उल्का !

अलका : अहो, तुम्हाला काही होतंय का ? मी दादांना बोलावते.

अतुल : छट्- आपल्या दोघात तो थेरडा कशाला ?

अलका : अहो, थेरडा काय म्हणताय ?

अतुल : ओऽ, फरगेट हिम... पण तू आज एकदम चिकनी दिसतेयस बघ.

अलका : अं... मी आत जाते.

अतुल : ए... ए... आत नाही... बाहेर.

अलका : अं- बाहेर ?

अतुल : येस- चल- मस्त फिरायला जाऊ- झकास बिअर मारू !

अलका : बिअर मारू ?

अतुल : कमॉन-

अलका : आपण दोघंच ? मी माणिकला बोलवू का ?

अतुल : कशाला पाहिजे ती पिटपिटी ? चल- आज फक्त तू आणि मी-

अलका : अतुल- खरंच जायचं का ?

अतुल : म्हणजे काय ?

अलका : पण बाहेर कशाला ?

अतुल : अरे... मूड नको यायला !... आज तुला लग्नाची मागणी घालणार आहे मी.

अलका : दादा ऽ ऽ ( करीत आत पळते, दादा हसत बाहेर येतात. )

दादा : ( शेकहॅन्ड करीत ) अभिनंदन ! कॉंग्रॅच्युलेशन्स, यंग मॅन !

अतुल : ( बेफिकिरीने ) इट्स ओके, ओल्ड मॅन.

(माणिक व अलका एकमेकींना बिलगून बाहेर येतात )

अतुल : ( दमात ) माणके–

माणिक : काय ?

अतुल : आतनं जरा माझा पाऊच घेऊन ये.

माणिक : मी का आणू... तुझा तू आण की !

अतुल : ए–आता आणतेस गप, का देऊ एक लाफा ? (माणिक आत पळते)दादा, यू हॅव अ फॅग ?

दादा : फॅग ?

अतुल : सिग्रेट हो... (दादांकडून सिग्रेट घेऊन शिलगावतो)

अलका : अतुल– सिग्रेट ओढणार तू ?

अतुल : ओ येस– व्हाय नॉट ?

अलका : तुझं आयुष्य सात मिनिटांनी कमी होणार.

अतुल : अरे, मारो गोली ! चलो, अलका डिअर– बाय ऽ (अलका व अतुल बाहेर जातात. माणिक पाऊच घेऊन बाहेर येते)

दादा : तो ‘ बाय ’ला घेऊन गेला, आता पाऊच काय करायचा ?

(माणिक व दादा एकमेकांकडे पाहात असताना अतुल परत येतो.)

माणिक : मी पिटपिटी काय ?

दादा : आणि मी थेरडा काय ?

अतुल : दादा, ऑल इज फेअर इन वॉर ॲन्ड लव्ह. (शेकहॅन्ड करीत) थँक यू. थँक यू व्हेरी मच.

दादा : अरे, थँक यू काय गध्या– पाया पड.

अतुल : आता जोडीनंच येतो पाया पडायला ! (बाहेरून अलकाची हाक. ‘अतुल’) – कमिंग डिअर, ओके– बाय.

दादा : (माणिकला) पाहिलीस माझ्या हिप्नॉटिझमची कमाल !

अतुल : (दारातून) छे...मी हिप्नोटाईझ झालोच नव्हतो. (हसत जातो.)

माणिक : अय्या ! हा तर ‘ सुटला ’च आहे.

दादा : मग, पिटपिटे, ‘सोडला’य कुणी ? केला की नाही त्याचा पार शम्मी कोंडके.

माणिक : पण दादा, बघा हं, परत लाफा मारीन म्हणाला, तर सरळ राणेबाईकडं जाईन मी...

दादा : हा हा...अरे, कोण आता डरतो आहे- तुझ्या राणेबाईला !

माणिक : अस्सं ?

दादा : मग ?-

कोण आता डरतो आहे तुझ्या राणेबाईला
धमाल आता सुटला आहे अतुल अमुचा चेला
आधीच होता मर्कट आणि त्यात मद्य प्यायला
मला सुद्धा गं कळले नाही काय झाले, च्यायला !

(सुनीता, प्रभाकर, लीलाताई, बापट येतात. बोलत बोलत)

प्रभाकर : पण तुम्ही काही म्हणा, मला शेवट पटला नाही.

सुनीता : पण शेवट गोड झाला की नाही ?

दादा : अरेच्या ! तुम्हांला कसं कळलं ?

सुनीता : म्हणजे ?

दादा : शेवट गोड झाला ते ?

सुनीता : अहो, म्हणजे काय- आम्ही पिक्चरच्या शेवटाबद्दल बोलताय.

बापट : बट इट वॉज अ नाइस थीम यू नो—

दादा : थीमचं राहू द्या हो, निळूभाऊ- टी व्ही वर ताजी बातमी मिळाली का तुम्हांला ?

प्रभाकर : कसली बातमी, दादा ?

माणिक : फार धमाल आहे, बाबा.

प्रभाकर : परत चीफ मिनिस्टर बदलला की काय ?

दादा : नो नो-देशापुढील एक ज्वलंत प्रश्न मिटला.

बापट : वेल, देन-कॅश्मीर इश्यू यू नो ?

दादा : (त्यांच्याच स्टाईलमध्ये) दॅट इज स्टिल इन यूनो ? यू नो ?
(सगळे हसतात.)

लीला, सुनीता : अय्या- मग कुठला ?

दादा : म्हणतात ना- काखेत कळसा आणि यूनोला वळसा. अहो सूनबाई- सध्या तुमच्यापुढे असलेला सगळ्यात ज्वलंत प्रश्न कुठला ?

सुनीता : अं... हं... गॅसचा !

लीला, बापट : –गॅसचा ?

दादा : अहो, तसला ज्वलंत नाही हो-हा जिवंत प्रश्न सुटलाय !



[stamp] क्र. २२४५७ ता. २२।६।८८

माणिक : आई, अगं, अतुलचं लग्न ठरलं.

लीला }
सुनीता } : (एकदम) अय्या ऽ!

दादा : आणि हो– अलकाचंही लग्न ठरलं.

प्रभाकर }
बापट } : (एकदम) अरेच्च्या!

माणिक : थोडक्यात काय– अतुल आणि अलकाचं लग्न ठरलं! (एक सामुदायिक 'ऑं!')

दादा : हां!

बापट : वेल. यू नो– आय मीन– वेल, यू नो–

दादा : नो मिस्टर बापट, यू डोन्ट नो एनिथिंग... (सगळे हसतात)
'हॅपी डेज आर हिअर अगेन'–
(सगळे अंगठे दाखवीत 'थम्स अप' म्हणतात.
माणिक– 'एव्हरीबडी इज फीलींग ग्रेट ऑन' करीत आत जाते. 'थम्स अप'च्या बाटल्या आणते. जाहिरात चालू असताना प्रत्येक जण काहीतरी जाहिरातीतील अॅक्शन करण्याचा प्रयत्न करतो. खुशीचं वातावरण.)

सुनीता : ही काहीतरी दादांनी करामत केलेली दिसते.

प्रभाकर : मग– शेवटी बाप कुणाचा आहे!

दादा : (प्रेक्षकांना) खरंय– आमची पहिली करामत म्हणजे हा– प्रभाकरच!

सुनीता : पण छान झालं बाई, सून अगदी शोभेलशी मिळाली.

प्रभाकर : कुणाला शोभेलशी– सासूला?

सुनीता : नाही तर काय सासऱ्याला? (सगळे हसतात)

सुनीता : अहो, मी काय म्हणतेय!

प्रभाकर : मी कधी काही म्हणतो का?

सुनीता : तुम्ही ऐकताय का?

प्रभाकर : न ऐकून करता काय?

(सगळे हसतात. लीला व बापट हसत आत जातात.)

दादा : कॉंग्रॅट्स... लंडन रिटर्न सूनबाई मिळाल्याबद्दल– चला, मुक्ताबाई... सूनबाईंचं ऐकू देत तुझ्या बाबाला. (दोघे आत जातात.)

प्रभाकर : हं... बाईसाहेब, बोला आता.

सुनीता : नाही– मी काय म्हणतेय–

प्रभाकर : अरेच्च्या– आता म्हणा ना.

सुनीता : झालं हे सोन्याहून पिवळं झालं.

प्रभाकर : एकदम!

सुनीता : (काहीशा हळू आवाजात) पुढचं सगळं नीट पार पाडा म्हणजे झालं...

प्रभाकर : मग यात हळू बोलण्यासारखं काय आहे- कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहे.

सुनीता : (बाजूला घेत) कार्याचं नाही म्हणत मी- बोलणी नकोत करायला ?

प्रभाकर : आता कसली बोलणी ?

सुनीता : म्हणजे काय- देणंघेणं बघायला नको... का मुलगी आणि नारळ घ्यायचा फक्त ?

प्रभाकर : नारळ कशाला ?

सुनीता : अहो, असं काय करताय- अतुलची काही हौसमौज आहे की नाही ?

प्रभाकर : अहो, म्हणजे हुंडा मागायचा की काय ?

सुनीता : हुंडा कुठं म्हणतेय मी...लग्नखर्च कुणी करायचा ?

प्रभाकर : ते नंतर बघू हो.

सुनीता : नंतर कशाला.

प्रभाकर : त्याचं बघू हो सावकाश !

सुनीता : अहो, पण नाहीतरी आता काय करताय ?

प्रभाकर : आता आधी मी जरा पडतो.

(सुनीता कपाळावर हात मारून घेत असताना काळोख)

## अंक दुसरा : प्रवेश दुसरा

(प्रभाकर, सुनीता, अतुल गंभीर चेहरे करून बसलेले. दादा अस्वस्थपणे फेऱ्या मारतात. एकेकाच्या जवळ जाऊन निरखून पाहतात. प्रत्येकजण तोंड वळवतो. दादा पुन्हा फेऱ्या मारतात. थांबून.)

दादा : मी अजून किती फेऱ्या मारल्यावर तोंड उघडणार आहात तुम्ही ?
(सगळे गप्पच.)

दादा : (प्रेक्षकांना) सगळे डायलॉग्ज विसरलेले दिसताहेत, बरं का- (सगळे चमकून दादांकडे पाहतात. पुन्हा खाली माना) अरे- मग एखाद्या नाटकात डायलॉग विसरलेली पात्रं स्टेजवर मख्खपणे बसावीत तसे, का बसलाय तुम्ही ? छे ! मी मात्र आता कितीही अस्वस्थ झालो तरी येरझाऱ्या घालणार नाही. (बसतात) अतुल, अरे, तुम्ही खरंच काही बोलणार नाही...मग मी पडदा टाकू का ? (सगळे चमकून 'आं' करतात) अरे, म्हणजे तुझ्या लग्न प्रकरणावर पडदा पडला, असं समजायचं का ?

अतुल : मी काय सांगणार, दादा ?

दादा : आं...अरे, खुद्द तू असं म्हणतोस ? अरे, तुझ्या लग्नाची इथं कशी धामधूम हवी आज–मग ? आणि आज तर इथं चक्क सामसूम दिसतेय, समाजवाद्यांची सभा असावी अशी.

अतुल : दादा, धामधूम करण्यासारखं काय आहे ?

दादा : आं...अरे वा ! सहजासहजी लग्न जमलं, म्हणून तुला काय चेष्टा वाटली ? वा...म्हणे धामधूम करण्यासारखं काय आहे ! अरे, तू नाही तुझा बाप करेल धामधूम– काय प्रभाकर ?

प्रभाकर : मी काय सांगणार ?

दादा : तू काय सांगणार ? आता तेही मीच सांगू का ? (शांतता) अरे, तुम्हा लोकांना झालंय तरी काय ? सूनबाई– तुमचं म्हणणं तरी काय आहे ?

सुनीता : माझं काही म्हणणं नाही !

दादा : प्रभाकर, तुझं काय म्हणणं आहे ?

प्रभाकर : (उठत) मी जरा पडतो.

दादा : तू पड नुसता...इकडं मीच तेवढा धडपडतो.

प्रभाकर : (बसत) बरं, नाही पडत मी, पण माझं काही म्हणणं नाही.

दादा : सुनीताचं नसल्यावर तुझं काय म्हणणं असणार म्हणा !

सुनीता : तसं काही नाही. त्यांना हवं ते खुशाल म्हणू शकतात. मी काय त्यांना बोलू नका म्हणतेय ?

दादा : (प्रभाकरला) काय रे, सूनबाई काय तुला बोलू नका म्हणते ?
(प्रभाकर फक्त सुनीताकडं बघतो)

सुनीता : अहो, बघताय काय माझ्याकडं...नाही म्हणा की.

प्रभाकर : (पटकन) नाही– नाही.

दादा : काय नाही ?

प्रभाकर : अं ?

सुनीता : अहो, मी तुम्हाला आडवते का कधी...नाही ना ?

प्रभाकर : (आठवून) छे... छे... जे मला म्हणायचं; ते मी खुशाल म्हणू शकतो.

दादा : हो ना ?... मग म्हण बरं.

प्रभाकर : पण मला काहीच म्हणायचंच नाहीय !

दादा : अतुल ?

अतुल : माझं काहीच म्हणणं नाही. आईबाबा म्हणतील ते मला मान्य आहे.

दादा : अरे– पण ते तरी कुठं काय म्हणताहेत ?
(शांतता–दादांच्या फेऱ्या.)

दादा : (वैतागून) अरे... तुम्ही बोलणार आहात की नाही ?

सगळे एकदम : पण आमचं काहीच — ( सगळे थांबतात. )

सुनीता : आम्ही काय बाटलीनं दूध पीत नाही म्हणावं.

दादा : (दचकून) आं... हे कुणाला म्हणावं ?

सुनीता : कुणाला नाही.

दादा : अच्छा- म्हणजे सूनबाईचं स्वगत चाललंय वाटतं. सूनबाई, स्वगतचा जमाना गेला आता.

सुनीता : दुसरे बोलून ऐकत नाहीत- तेव्हां स्वगतच बोललं पाहिजे, दुसरं काय करणार !

दादा : कोण ऐकत नाहीत ?

सुनीता : कुणी नाही.

दादा : हे सगळं लंडनच्या मंडळींबद्दल चाललंय काय ? काय ते स्पष्ट बोलून टाका.

सुनीता : छे— आता कशाला काय ठरवायचं ?- लग्न ठरलं ना- मुलगी आणि नारळ.

प्रभाकर : अगं, नारळ- नारळ काय करतेयस ? जरा काही झालं की तुझा आपला नारळ.

सुनीता : जाऊ दे ना, मी आपली गप्पच बसते.

दादा : अच्छा... अच्छा...अच्छा... एकूण मुलाकडची मंडळी रुसलीयत तर.

अतुल : दादा, तुम्हीच सांगा. आधी लग्नाचं पक्कं व्हायला नको ?

दादा : बाप रे... म्हणजे अजून लग्नाचं पक्कं नाही !

सुनीता : पक्कं कसं होणार ? बोलणी नको व्हायला ?

दादा : अच्छा ! इथं अडलंय होय घोडं ?

प्रभाकर : ( उत्साहाने) आणि वरातीमागून घोडं काय कामाचं ?

दादा : अरे वा... बोललास की तू- आणि चक्क चांगलं बोललास !

सुनीता : नाहीतर काय- लग्नानंतर का बोलणी करायचीत ?

दादा : हात्तिच्या- हुंडा मागायचा होय ?

( सगळे एकदम- ' नाही, हुंडा नाही ', ' छे...छे हुंडा नाही ' असं स्पष्ट करतात)

सुनीता : आम्हाला नारळसुद्धा नको म्हणावं.

प्रभाकर : (वैतागून ) तुझा पुन्हा तो नारळ !

दादा : अरेच्या- मग बांधा कुठं आला- ते काय नारळ घ्याच म्हणतायत ?

सुनीता : ते कशाला म्हणतील- तेवढेच नारळाचे दोन रुपये वाचतील.

प्रभाकर : नाहीतरी, लंडनला नारळ कुठं मिळतात !

(सुनीता व अतुल हसतात)

दादा : तुम्ही सगळे मला अगोदर हे सांगा– हे लग्न पक्कं आहे की नाही ?
(सगळे गप्प)

दादा : अतुल–?

अतुल : मला अलका पसंत आहे.

दादा : मग सासू पसंत नाही का ?

प्रभाकर : आधी बोलणी व्हावीत.

सुनीता : नाहीतर काय– लग्न हवं; पण सुतळीचा खर्च नको.

दादा : हा सस्पेन्स मला कधी कळला नाही, लग्नात सुतळी कशाला लागते ?

सुनीता : नकोच म्हटल्यावर, भटजीसुद्धा लागत नाही.

अतुल : फुकटातच करायचं तर, आळंदीला करू या की.

दादा : पण तिथं पळून जावं लागतं.

प्रभाकर : मग अतुल, अलका जातील की पळून–

दादा : अलका येत नाही म्हटली, तर ?

अतुल : ती काय नाही येत- तिचा– ( थांबतो )

दादा : तिचा बाप येईल ! पण तो येऊन उपयोग काय ?

अतुल : हे सगळं बापटांनी प्लॅन केलं होतं, असं आम्हाला वाटतं.

दादा : आय सी...पण समजा, असलं; तर बिघडलं कुठं ? झालं हे चांगलंच झालं की नाही ?

अतुल : पण याचा अर्थ; त्यांनी आमचा ' मामा ' बनवू नये. दादा, लग्नाचा खर्च बापटांनी केला पाहिजे, असं आईबाबांना वाटतं...आणि मलाही ते पटतं. खर्च टाळण्यासाठी बापटांनी बोलणी टाळावीत, हे मात्र अजिबात पटत नाही.

दादा : पण बापटांनी बोलणी टाळली का ?

सुनीता : दादा, जशी अलका अतुलच्या मनात भरली, तशी यांची नियत फिरली.

प्रभाकर : नाही तर काय !

दादा : तू बोललास का !– मला वाटतं, सकाळपासून बरंच काही योग्य योग्य बोललायस. तेव्हा तुला थकवा येणं साहजिक आहे. तेव्हा तुम्ही जरा आत जाऊन पडा !

प्रभाकर : ( उत्साहाने उठून ) हो...मी जरा पडतोच.
( आत जातो. )

सुनीता : पडा ! आता काय– पड खालीच आहे. (पुटपुटत आत जाते)
(अतुलही आत जाऊ लागतो. त्याला थांबवीत)

दादा : अतुल– काल तू अलकाबरोबर फिरायला गेला नाहीस, त्याचं कारण हेच का ?

अतुल : हे म्हणजे ?

दादा : म्हणजे- बापट बोलणी टाळतायत हे ?
अतुल : नाही. मला तिचा राग आलाय.
दादा : अरे...पण लगेच धसमुसळेपणा करू नये.
अतुल : मी कुठं काय केलं ?
दादा : वा- परवा अंधारात तिचा हात कुणी धरला !
अतुल : (दचकून) तिनं सांगितलं हे ?
दादा : नाही- मी चोरून पाहिलं...तिनं हात सोडवून घेतला ना- ? अरे, त्यात रागावण्यासारखं काही नाही.
अतुल : पण मी त्यासाठी नाही रागावलो. परवा प्रेझेंट देत होतो मी, तर काय म्हणाली माहिती आहे ?
दादा : नाही बुवा.
अतुल : हे तुम्ही चोरून ऐकलेलं दिसत नाही !... म्हणाली- प्रेझेंट देऊन बांधून ठेवतोयस का. मी काय पळून जातेय का लंडनला ?
दादा : अरे, मग झकास...जा म्हणावं पळून- नाहीतरी बोलणी झाली नाहीच आहेत.
अतुल : तसं नाही हो...माझा पण... ( थांबतो )
दादा : जीव अडकलाय तिच्यात- राईट ? ( त्याच्या केसांवरून हात फिरवीत ) अरे, वा रे मेरे लल्लू !
अतुल : दादा- काही झालं तरी हे लग्न होणार !
दादा : मग बापटांनी खर्च केला नाही- तरी ?
अतुल : पण मी म्हणतोय- लग्नात खर्च हवाय कशाला! अगदी साधेपणानं लग्न करावं.
दादा : क्या बात है !
अतुल : आणि जो काही खर्च वाचेल तो-म्हणजे तेवढी रक्कम- बापटांनी अलकाच्या नावानं बँकेत ठेवावी. आम्ही हिशोब केलाय. लग्न साधेपणानं केलं, तर साधारण तीस हजार वाचतात.
दादा : ( बुचकळ्यात ) आय सी...म्हणजे तुझं म्हणणं, जर बापटांनी तीस हजार बँकेत ठेवले, तर लग्न साधेपणानं करायचं.
अतुल : करेक्ट.
दादा : आणि बापटांनी पैसे नाहीच ठेवले तर ?
अतुल : मग करा म्हणावं खर्च.
दादा : आय सी.

( बापट व लीलाताई येतात. )

अतुल : ( त्यांना पाहून प्रभाकरच्या स्टाईलमध्ये ) अं...दादा- मी जरा पडतो.
बापट : गुड इव्हनिंग, दादासाहेब.

दादा : गुड इव्हनिंग, बापटसाहेब...या, या...गुड इव्हनिंग, लीलाताई, (फक्त त्यांच्याशी शेकहॅन्ड करतात.) कुठे होता दौरा.

बापट : सारसबागेत गेलो होतो.

दादा : अरेच्या... या वयात!

बापट : वेल...यू नो.

लीला : गणपतीला पेढे ठेवायला गेलो होतो...अलकीचं लग्न ठरलं ना.

दादा : अरे वा...मग पेढे कुठायत?

लीला : (पेढा देत) तसे प्रसादापुरतेच घेतले होते– घरी आणणार होतो– पण फारसे बरे मिळाले नाहीत, नाही का हो?

बापट : या...दॅट्स राईट.

दादा : हे फारच वाईट.

बापट } लीला } : ...आँ!

दादा : तुम्हाला पेढे बरे मिळाले नाहीत, हे फारच वाईट झालं...बाय द वे, लंडनला असतात का?

लीला : अय्या...नसायला काय झालं? उलट इथल्यापेक्षा छान मिळतात.

दादा : पेढे नाही...गणपती म्हणतोय मी.

बापट : वेल...गणपती यू नो...आय मीन, आय डोन्ट नो...

दादा : नाही, मी अशासाठी विचारलं...म्हटलं; अतुल-अलकाचं लग्न तुम्ही लंडनला करायचा ठरवलंत,तर आयत्या वेळी पाया पडायला गणपती नाही असं नको.

लीला : (हसत)...छे! अहो, एवढं पुणं असताना– लंडनला कशाला ते...नाही का हो!

बापट : ओ या...पूना इज बेस्ट ..तुम्हाला सांगतो, दादासाहेब, पुण्यासारखं शहर नाही.

दादा : काही हरकत नाही. पुण्यातच जोरदार लग्न करून टाकू!

बापट : वेल...यू नो...

लीला : लग्नऽऽ...मी काय म्हणते, दादासाहेब...लग्न अगदी साधेपणानं करावं... नाही का हो?

बापट : 'या'...उगाच वेस्ट कशाला करायचा?... माझं असं मत आहे, दादासाहेब, लग्न हे अगदी साधेपणानंच करावं.

दादा : अच्छा...?...तुम्हीपण साधेपणानंच केलं असेल नाही?

बापट : वेल...आमचं...यू नो–

लीला : छे...आमचं लग्न अगदी जोरात झालं. यांच्या वडिलांची इच्छा होती. एकुलता एक मुलगा आहे त्यामुळं लग्न थाटात व्हावं.

दादा : काय योगायोग आहे...अतुलसुद्धा एकुलता मुलगा आहे.
(बापट व लीलाताई दचकतात)

लीला : हो...पण.. एकुलता म्हणजे...

बापट : मी प्रभाकरशी बोललोय...त्याची काहीच अपेक्षा दिसत नाहीय...अगदी साधा माणूस आहे तो.

लीला : हो ना ..आणि हल्ली काळही किती बदलाय.

दादा : खरंय, लीलाताई, हा काळ मोठा चावट प्राणी आहे.सारखा बदलत असतो वेटा...तेही प्रत्येकाच्या सोयीनुसार.

लीला : पण काही म्हणा- अलकाला स्थळ मात्र अगदी मनासारखं मिळालं बाई... असं स्थळ शोधून मिळायचं नाही.

दादा : शोधून मिळायचं नाहीच... अगदी डोळा ठेवून गटवावं; तेव्हा मिळतं !

बापट : वेल...

लीला : आमच्या तर ध्यानीमनीही नव्हतं. आता मुलांनीच जमवलं म्हटल्यावर, नाही तरी कसं म्हणणार ! नाही का हो ?

दादा : आता तुम्हीच असं म्हटल्यावर, बापट तरी नाही कसं म्हणणार ? नाही का हो, बापट ?

बापट : हो ना...नाही, आय मीन, वेल...

दादा : बापटसाहेब...तुमचा पत्ता मात्र देऊन ठेवा... लग्नानंतर अतुलबरोबर मीही येईन म्हणतो.
(बापट व लीलाताई एकमेकांकडं पाहतात)

लीलाताई : तुम्हाला...दादासाहेब, लंडनला नाही करमायचं...नाही का हो ?

दादा : अहो, मला कुठे जास्त राहायचंय... खूप दिवस मनात आहे; लंडनला जाऊन यावं. एक महिना खूप झाला.

बापट, लीला : (एकदम) महिना ?

लीलाताई : पण हल्ली पासपोर्ट वगैरे अगदी त्रासदायक प्रकार झालाय. नाही का हो ?

दादा : असं ? पण अतुलच्या मनात तर फार दिसतंय.

लीला : काय ते ?

दादा : हनिमून लंडनला करावा म्हणून.

बापट : वेल- यू नो...टु बी फ्रॅन्क, दादासाहेब, लंडनमध्ये तसं विशेष काही नाही. आपल्याला वाटतं- हे आहे, ते आहे- पण तसं विशेष काही नाही.

लीला : त्यापेक्षा आपलं काश्मीर दहापटीनं चांगलं.

दादा : काही हरकत नाही... कल्पना चांगली आहे. लग्न झालं की, काश्मीरसाठी प्लेनची दोन तिकीटं ठेवा पोरांच्या हातात.

बापट : वेल...कश्मीर म्हणजे जस्ट एक एक्झाम्पल म्हणून दिलं. हनिमूनला कुठं जावं, हा त्या यंग कपलचा प्रश्न आहे. लेट देम गो एनिव्हेअर. वुइ शुड वेट ओनली फॉर देअर हॅपी रिटर्न्स !

लीला : हो ना–आम्ही तर बाई माथेरानला गेलो होतो. माथेरानसुद्धा खूप छान आहे.

दादा : अर्रर्र– लीलाताई, हनिमूनला माथेरानला जाऊ नये म्हणतात.

बापट : का ?

दादा : पोरं माथेफिरू होतात म्हणतात.

लीला : (तंद्रीतच) आणि हनिमूनचं काय, कुठंही केला तरी छानच वाटतं !

दादा : बरं झालं सांगितलं ते. हे मला माहीत नव्हतं. मग ते आपलं हे कसं आहे– शनिवारवाडा ? (बापट दंपती 'ही ही' करत 'चला... चला आपल्याला नेन्यांकडे जायचेय' म्हणत बाहेर सटकतात. दादा प्रेक्षकांना) पाहिलीत ही बापट मंडळी ? लग्न टरल्यापासून सकाळ-संध्याकाळ त्या नेन्यांना बोअर करतात. सगळ्या मुलींचे आईबाप असे सटकू लागले, तर हुंड्याचा प्रॉब्लेमच मिटून जाईल.

(माणिक व अलका बाहेरून हसत येतात)

दादा : या, पद्मिनी कोल्हापुरे. कसं व्हायचं तुमचं !

माणिक : दादा, तिची काळजी सोडा. तिचं होतंच आहे.

दादा : इतकं सोपं नाही ते. केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे !

माणिक : पण काय केलेचि पाहिजे ?

दादा : मला विचारा ना– मी इथं खांबासारखा उभा आहे.

माणिक }
अलका } : मग सांगा ना !

दादा : हे पहा मुलींनो–प्रसंग नाजूक आहे. अगदी वक्त बांका आहे म्हटलं, तरी चालेल. सो नाऊ यू हॅव टु कम इन ॲक्शन.

माणिक : मी आहे ना...काय करायचं मला सांगा !

दादा : तू नको.

माणिक : का ?

दादा : कारण हे थोडं समंजस मुलीचं काम आहे. अलका, लग्नाचं टरलं...खर्चाचं काय ?

माणिक : म्हणजे काय– खर्च करायचाय का लग्न करायचंय ?

दादा : श्शूऽऽ...मुलाकडच्या मुलीनं मध्ये बोलायचं नाही. अलके... तीस हजार हुंडा हवा आहे.

अलका }
माणिक } : (एकदम मोठ्यानं) हुंडा ?

दादा : श्शूऽऽ हळू...तो आतनं धोंडा घेऊन येईल.

माणिक : (ताडकन उठत) हुंडा घेऊच देत; मी गाढवमोर्चाच घेऊन येईन.

दादा : तू फक्त मोर्चा आण– गाढवाचं मी बघतो.

माणिक : घरात आहेच की.

अलका : दादा, काय सांगताय! अतुलनं चक्क हुंडा मागितला?

दादा : ॲक्च्युअली हुंडा नाही मागितला– हुंडी मागितली हुंडी.

अलका : हुंडी?

दादा : म्हणजे चेक गं... तुझ्या नावे बापटांनी बँकेत तीस हजार ठेवावेत, म्हणजे लग्न झालं.

अलका : (उठत) हे लग्न मोडलं.

दादा : श्शूऽऽ. अलका, देशपांड्यांच्या घरातली लग्नं अनब्रेकेबल असतात.

अलका : पण दादा...मी आताच बोलते त्याच्याशी. (आत जाऊ लागते)

दादा : ऐक माझं... (तिला थांबवतात) ही आघाडी मी सांभाळतो. तुम्ही लंडनची बाजू सांभाळा...

अलका : म्हणजे काय...?

दादा : सगळ्या हालचाली अगदी विद्युत वेगानं व्हायला हव्यात...जरा कान इकडे करा...

(दादा माणिक– अलकाच्या कानांत कुजबुजतात. मागे कार्टून म्युझिक. माणिक व अलका 'आं?' 'हां हां' करीत ऐकतात. काळोख)

## अंक दुसरा : प्रवेश तिसरा

(बापट आणि लीलाताई बसलेत. अलका येरझाऱ्या घालतेय)

अलका : मम्मी...पप्पा– मला तुमच्याशी जरा बोलायचंय.

बापट : वेल... यू आर वेलकम.

अलका : पप्पा, मला वाटतं, आपण जरा घाई करतोय.

बापट : कशाची?

अलका : माझ्या लग्नाची.

बापट : (सावरून बसत) वेल...

लीला : (सावधपणे) अगं, पण घाई कसली– तुझं वय...

अलका : प्रश्न वयाचा नाही, मम्मी.

लीला : मग कसला आहे?

अलका : लग्न म्हणजे आयुष्याचा प्रश्न नाही का?

लीला : अगं, असं कसं !
बापट : ' या '. तसं काही नसतं, मला आत्ता कळलं.
अलका : म्हणजे लग्न हा आयुष्याचा प्रश्न नसतो का ?
बापट : वेल...यू नो .. आय मीन.
अलका : पप्पा, मी या ट्रीपला परत येते लंडनला.
(बापट व लीला सुन्न !)
लीला : अगं, अलके, तुझ्या मनात काय आहे ?
अलका : मला वाटतं, आपण थोडं थांबावं.
लीला : अगं, पण कसं थांबणार ? यांची रजा संपतेय.
अलका : अं हं. मम्मी, इथे थांबायचं म्हणत नाही मी.
लीला : मग ?
अलका : लग्नाचं जरा थांबावं.
लीला : पण...
अलका : निदान दोन वर्षं तरी.
लीला : अगं, पण दोन वर्षांत–
अलका : –माझं वय दोन वर्षांनी वाढेल.
लीला : आणि मुलीचं वय वाढलं–
अलका : –की मागणी कमी होईल. पण अतुलसाठी मी थांबायला तयार आहे.
लीला : पण दोन वर्षं कशासाठी थांबायचं ?
अलका : त्याला प्रॉब्लेम आहे.
बापट : वेल– व्हॉट्स दॅट ?
अलका : अं... त्याला लग्नानंतर वेगळं राहायचंय.
बापट : सो ?
अलका : म्हणजे वेगळा फ्लॅट हवा... परवा आम्ही एक फ्लॅट पाहूनसुद्धा आलो— दोन रूम्सचा आहे.
बापट : मग दोन वर्षं थांबायचं कशाला ?
अलका : खरं तर; काहीच कारण नाही...तुम्ही सत्तर हजार देत असलात तर–
बापट : सत्तर हजार !
अलका : हो. दोनच रूम्सचा आहे ना–
बापट : वेल...आय मीन...
लीला : अगं, एकदम एवढे म्हणजे...
अलका : त्या भांबुर्ड्यांच्या मुलाला देत होताच की तुम्ही ! मग अतुलला का नाही ?
बापट : वेल...अलका, यू नो—
अलका : आय डोंट नो एनिथिंग, पप्पा, फ्लॅट तुमच्याकडून पाहिजे.

लीला : अहो, मी काय म्हणतेय, नाहीतरी आपण प्रोव्हिजन केली होतीच. आता दुसरा काही उपाय दिसत नाही.

बापट : वेल...छोटा फ्लॅट घेतला तर–

अलका : हा छोटाच आहे, पप्पा...दोन रूम्सच.

बापट : वेल– दोन रूम्स .दोन रूम्स लागतीलच नाही का.

लीला : अलके, फ्लॅटचं जमलं की झालं ना ?

अलका : मग काय– फक्त लग्नखर्चच राहिला.

(बापटांना अचानक ठसका लागतो. लीलाताई पाणी आणून देतात.)

लीला : अगं, आता खर्च कशाला करायचा आपण ?

अलका : करायचा नाहीच.

बापट : वेल... खर्च करायचा नाही ना ? ... दॅट्स गुड.

अलका : आपण फक्त हिशोब करायचा. हे बघ, पहिलं काय– कार्यालय– त्याचे तीन हजार– जेवण; दोनशे न् दोनशे– चारशे–

लीला : अगं, चारशेत कुठं जेवण होतं !

अलका : चारशे माणसं गं... एका ताटाचे किती– दहा धर, म्हणजे चार हजार... अतुलचा सूट...

लीला : सूट आपणच द्यायचा ?

अलका : द्यायचा नाहीच गं... नुसता हिशेब करायचा... हं... शालू... (पुटपुटते) एकोणतीस अन् तीन... बत्तीस. बघ– मम्मी, आपण लग्न साधेपणानं केलं तर, बत्तीस हजार वाचतात आपले.

बापट : आय लाइक इट... उगाच खर्च कशाला करायचा ?

अलका : करायचा नाहीच– वाचवायचा... आणि माझ्या नावानं बॅंकेत ठेवायचा... आहे की नाही आयडिया... पप्पा, तुम्ही आताच बत्तीस हजाराचा चेक देऊन ठेवा... अतुल आला की, त्याला मी पप्पा– मम्मीचं खास प्रेझेंट म्हणून देऊन टाकते.

बापट : म्हणजे आमचा खर्च झालाच !

(चेकबुक पुढे करते– बापट आवंढे गिळीत चेकवर सही करतात. बापट उठून दाराकडे जातात)

लीला : अहो, तुम्ही कुठे निघालात ?

बापट : जरा मोकळ्या हवेत फिरून येतो. जरा बरं वाटेल.

लीला : थांबा. मी पण येते– मलाही कसंसंच होतंय.

बापट : चला–

अलका : सावकाश या, मम्मी–पप्पा. (हसते. आतून अतुल येतो.)

अलका : (उत्साहानं) हाय!

अतुल : हाय!

अलका : राग गेला का?

अतुल : कसला राग?

अलका : परवाचा.

अतुल : तू माझं कधीच सिरिअसली घेत नाहीस.

अलका : लग्नानंतर घेईन.

(शांतता)

अलका : चालेल का?

अतुल : काय?

अलका : लग्नानंतर घेतलेलं?

अतुल : पण काय?

अलका : सिरिअसली रे.

अतुल : (गोंधळून) काय पण?

अलका : तुझं बोलणं रे. (खळखळून हसते) अतुल- मी काय म्हणतेय- आपण लग्न साधेपणानं केलं तर?

अतुल : मी तेच तर म्हणतोय.

अलका : लग्न साधं केलं, तर खर्च वाचेल- नाही का?

अतुल : अगदी माझ्या मनातलं बोललीस.

अलका : ए... पण किती वाचेल रे?

अतुल : तरी बराच वाचेल...

अलका : कुणाचा वाचेल?

अतुल : ॲक्च्युअली-

अलका : ॲक्च्युअली खर्च आमचा वाचेल... तुझ्या मते किती वाचेल?

अतुल : खर्च काय- करण्यावर असतो... पण अराउंड तीस हजार.

अलका : माझ्या हिशेबाप्रमाणं बत्तीस हजार वाचतील. पप्पांनी हे पैसे बँकेत ठेवलेयत माझ्या नावानं- आपल्या लग्नाचं प्रेझेंट म्हणून- हे बघ... हा चेक. रुपये बत्तीस हजार फक्त... घे रे, सही केलीय.

(आत जाते. एकदम अंधार. अतुल 'लाईटस्, लाईटस्' म्हणून ओरडतो. एकदम धोडदौड व आरडाओरडीचा आवाज.

समोर गार्डनच्या दिशेने उजेडात पाठमोरी स्त्री-फुलनदेवीच्या अवतारात उभी. उजव्या हातातील पिस्तुलाचे तीन बार काढते. अतुल दचकतो. तोंडाला रुमाल बांधलेली ती स्त्री विचारते- 'कितना, हुंडा लिया रे, इस

कमीनेने ?'— दादांचा आवाज– 'बत्तीस हजार, सरकार!')

अतुल : कोण आहे ? हू यू ..यू...( भीतीने गाळण उडते)

स्त्री : ( पिस्तुल धरून जवळ जवळ जात) तुमने मुझे पहचाना नहीं ? गाँवका बच्चा बच्चा मेरा नाम जानता है.

अतुल : अहो, असेल, पण तुम्ही कोण– ?

स्त्री : मेरा नाम है दुर्गा! गब्बरकी धाकटी बहीण!

अतुल : गब्बरकी धाकटी बहीण ? तुम्हाला 'छोटी बहन' म्हणायचंय का ?

स्त्री : (खेकसून ) नहीं– धाकटी बहीण. गब्बरकी धाकटी बहीण– दुर्गा.

अतुल : बरं, धाकटी बहीण तर धाकटी बहीण– पण तुम्ही आमच्या घरात कशाला आलात ?

स्त्री : मिस्टर अतुल देशपांडे—

अतुल : अरेच्या– तुम्हाला माझं नाव कसं माहिती ?

स्त्री : मैं सिर्फ तुम्हारा नामही नहीं; तुम्हारे पूरे खानदानको जानती हूँ–मेरे जासूस चारो तरफ फैले हुये है!

अतुल : असतील– पण मी काय केलं तुमचं ?

स्त्री : मिस्टर अतुल देशपांडे– यहाँसे पचास पचास कोस दूर गाँवमें, कोई हुंडा लेता है तो लोग कहते है– बेटा, हुंडा मत ले– हुंडा मत ले, वरना गब्बरकी धाकटी बहीण आ जायेगी– और तुमने हुंडा लिया।

अतुल : हे बघा– मी काही हुंडा घेतला नाहीय!

स्त्री : ( ओरडून ) झूठे– कमीने —

अतुल : ओ, हे बघा– तुम्ही दादागिरी करू नका.

स्त्री : हा हा हा! एक पुरुष होकर दादागिरीसे डरते हो मियाँ ?

अतुल : मी पुरुष नाहीय हो!

स्त्री : ( चमकून ) क्या ?

अतुल : मी दादागिरी करणारा पुरुष नाहीय. तुम्हाला काय हवंय ते घ्या आणि जा इथनं.

स्त्री : मैं अब तुम्हें नहीं छोडूँगी, (त्याच्या डोक्यावर पिस्तुल रोखत) क्यों के तुमने हुंडा लिया!

अतुल : अहो, पण—

स्त्री : ( पिस्तुल खाली घेत) इस पिस्तुलके अंदर बराबर तीन गोलियाँ है–गोलियाँ तीन और आदमी एक. बहुत ना इन्साफी है ये– अब हम इसको घुमाये देते है– अब कहाँ गोली है, कहाँ नही– हमका कुछ नहीं पत्ता —

अतुल : मला पण माहिती नाहीय.

स्त्री : खामोश– कमीने—

अतुल : ओ, तुम्ही शिव्या नका देऊ फुकट.
स्त्री : (पिस्तुल कपाळाला टेकवत) गाली नहीं खानी है- तो अब गोली सही! अब तेरा क्या होगा रे, कालिया?
अतुल : सरकार...सरकार, मैंने अपका नमक बचावच खाया है, सरकार!
स्त्री : अब गोली खा! बोल, तेरी आखरी ख्वाहिश क्या है?
अतुल : ते तेवढं पिस्तुल देता का?
स्त्री : चूप- अगर जान प्यारी है, तो वो दे दे-
अतुल : काय...हा दिवा पाहिजे का?...घेऊन जा.
स्त्री : ऊं हूं...(पिस्तुलाने खिशाकडे निर्देश करते)
अतुल : काय--चेक? च्यायला, यांना कसं कळलं माझ्या खिशात चेक आहे ते? (चेक बाहेर काढतो. स्त्री तो फाडते) अहो, फाडता काय! (स्त्री फाडलेला चेक अतुलच्या तोंडात कोंबते)
स्त्री : अब सरकार तुम्हे शबाशी देगा. चलो. (पळत निघते. पूर्ण उजेड. दादा व अलका येतात.)
दादा : कॉंग्रॅच्युलेशन्स, माणके! तुझं हे अभिनयाचं अंग माहिती नव्हतं. (माणिक तोंडावरचा बुरखा काढून टाकते)
अतुल : माणके- गधडे तू!
माणिक : ए, (बुरखा त्याच्याकडे फेकत) अच्छे खानदानके हो इसलिए छोड दिया. (अलका, दादा हसतात. गार्डनमधून मिस्टर, मिसेस बापट येतात)
लीला : माणके, काय गं हा तुझा ड्रेस?
दादा : हा ना? बोहारणीला भांडी देऊन घेतलाय.
माणिक : (पिस्तुल रोखत) दादा, बोहारीण नहीं. गब्बरकी धाकटी बहीण- दुर्गा!
बापट : गब्बरकी धाकटी बहीण? हा काय प्रकार आहे?
दादा : ते जाऊ द्या, मिस्टर बापट. लग्नाचं ठरलं, खर्चाचं काय?
बापट : ओ, डोंट वरी मिस्टर दादा देशपांडा, आम्ही अतुलला एक छोटा फ्लॅट प्रेझेंट द्यायचं ठरवलंय.
अतुल : थँक्यू, मिस्टर बापट. पण मला तो फ्लॅट नको आहे. आणि तुमचा तो बत्तीस हजारांचा चेकही मी फाडून खाल्लाय. (इतर सगळे हसतात)
बापट : फाडून खाल्लाय? बट इट वॉज अ प्रेझेंट टू यू फ्रॉम मिस्टर बापट फॅमिली.
अतुल : प्रेझेंट हे इंग्लिश गोंडस नाव दिलं, तरी मराठीत त्याचा अर्थ हुंडा असाच होतो.. ॲम आय राईट- अलका डार्लिंग?
अलका : यू आर ॲबसोल्यूटली राईट, माय डिअर. (दादा चक्क तोंडात बोटे घालून शिट्टी मारतात. प्रभाकर व सुनीता बाहेरून

येतात)

सुनीता : काय गं हे, माणके ?

प्रभाकर : तुझ्या हातात पिस्तुल ?

दादा : अरे, या पिस्तुलानेच तर लग्नाचा बार उडवलाय.

प्रभाकर : म्हणजे, लग्न झालं देखील ?

अतुल : लग्न झालं, म्हणजे– पक्कं झालं, बाबा !

माणिक : कारण हुंड्याचं विघ्न दूर झालं.

अतुल : आणि ही सगळी करामत दादांची !

दादा : छट्. ही सगळी करामत टिंगलीची !

सगळे : टिंगलीची ?

दादा : नाही कळलं ? एकजात सगळे बधिर आहेत. अरे, समर्थांनी म्हटलंच आहे,
- मवाळा आवडे विनोद आणि टवाळा आवडे—

सगळे : टिंगल !

अतुल : जय जय रघुवीर समर्थ !

दादा : मी केली फक्त टिंगल आणि जमून गेलं मंगल !

बापट : यू मीन जस्ट टिंगल !

दादा : येस. आय मीन जस्ट टिंगल !

लीला : लंडनमध्ये किनई, कुणी मेली टिंगलच करत नाही.

दादा : मला बोलवा ना. मी मोकळाच असतो.
(सगळे हसतात. माणिक एक शाल अतुल व अलकाच्या मध्ये अंतरपाटासारखी धरते)
हां, सगळं कसं कायदेशीर झालं पाहिजे. म्हणा, कुर्यात सदा—

सगळे : टिंगल !

दादा : कट्– कुर्यात सदा–

सगळे : मंगल !
(आनंदी संगीताच्या तालावर सर्वजण नाचत असताना पडदा पडतो.)

समाप्त

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
क्र. २२८५६ नों. दि २२।८।६८
वि. ...... क्र. ..................

# आम्ही प्रकाशित केलेली नाटके

| | |
|---|---|
| संगीत रंकाचे राज्य | वि. स. खांडेकर |
| स्वामी | रणजित देसाई |
| वारसा | ,, |
| हे बंध रेशमाचे | ,, |
| रामशास्त्री | ,, |
| धन अपुरे | ,, |
| लोकनायक | ,, |
| तानसेन | ,, |
| दुर्भंग | रत्नाकर मतकरी |
| जोडीदार | ,, |
| अग्निदिव्य | ,, |
| काळोख देत हुंकार | दिलीप परदेशी |
| सत्यं शिवम् सुंदरम् | ,, |
| मातृवेणा | ,, |
| तळहातीच्या नाजूक रेषा | ,, |
| गोष्ट तशी जुनी पण | ,, |
| म्हाराज म्येले | ,, |
| नाटक | ,, |
| काळी वेबी | ,, |
| निष्पाप | ,, |
| मन धुवांधार | ,, |
| अस्त | ,, |
| टिळेकरांच्या एकांकिका | चंद्रसेन टिळेकर |
| माझी बायको माझी मेव्हणी | हिराकांत कलगुटकर |
| वेलकम माय डियर | ,, |
| नवरा भाड्याने पाहिजे | ,, |
| बायका त्या बायकाच | दत्ता केशव |
| लागेबांधे | ,, |
| साक्षीपुरम् | रामनाथ चव्हाण |
| माझ्या बायकोचा नवरा | प्रभाकर तामणे |
| घोळात घोळ | बबन प्रभू |

| | |
|---|---|
| पिकलं पान | रा. रं. बोराडे |
| लफडा सदन | सुरेश पिप्रोडिया |
| बाईसाहेब | ,, |
| लैला ओ लैला | ,, |
| राहू केतू | ,, |
| ऊन पाऊस | सदानंद दळवी |
| बेअब्रू | ,, |
| डाग | ,, |
| परपुरुष | ,, |
| बेगम शबाब | रमेश पवार |
| आमचं प्रायव्हेट लिमिटेड | ,, |
| रंगा ड्रायव्हर | दत्ता खेबूडकर |
| डाकू विक्राळसिंग | साईदास आपटे |
| प्रतापगडाच्या छायेत | ,, |
| अमोघ | रतनलाल भंडारी |
| प्रयोगक्षम निवडक एकांकिका | सं. वि. भा. देशपांडे |
| अंधारातील काजवा | अरुणा श्रीखंडे |
| राष्ट्र / नातं | चंद्रकांत देशपांडे |
| एक गगनभेदी किंकाळी / दिनकर पुरोहिताचा खून | ,, |
| मृत्युदान | सतीश कर्णिक |
| बोनसाय | ,, |

मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६ सदाशिव, पेरुगेट जवळ
पुणे ४११ ०३०

अजब पुस्तकालय
भाऊसिंगजी रोड,
कोल्हापूर, ४१६ ०१२

IRBK-0122457